मराठी माणसाचा मानदंड

# राजदंड

। पश्चिम महाराष्ट्र ।

www.rajdand.com

follow us : /rajdandlive

RNI Regd No.72105/99 ✻ वर्ष २५ ✻ अंक २७० ✻ सातारा ✻ सातारा सोमवार दि. १० जून २०२४ ✻ पाने ८ ✻ किंमत ५ रू/


# कॅबिनेटमध्ये ७२ मंत्री! भाजपचे सर्वाधिक ६० मंत्री

## शिवसेना, RPI ला एक-एक राज्यमंत्रीपद

**दिल्ली :** नरेंद्र मोदी यांनी देशाचे पंतप्रधान म्हणून शपथ घेतली आहे. नरेंद्र मोदी तिसऱ्यांदा पंतप्रधानपदी विराजमान झाले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासोबत मंत्रिमंडळाचाही शपथविधी पार पडला. दिल्लीतील या सोहळ्याला सर्व क्षेत्रातील दिग्गजांनी हजेरी लावली. मोदी कॅबिनेट ३.० चा शपथविधी संपन्न झाला आहे. लोकसभा निवडणुकीत एनडीएने २९३ जागांवर विजय मिळवला. यामध्ये भाजपला २४० जागा जिंकता आल्या. तर तेलगू देसम पक्षाला १६ आणि युनायटेड जनता दलाने १२ जागा जिंकल्या.

मोदी कॅबिनेटमधील सर्व मंत्र्यांची यादी पाहा.

मधील सर्व मंत्र्यांची यादी

कॅबिनेट मंत्री - ३०

राजनाथ सिंह, अमित शाह, नितीन गडकरी, जे.पी.नड्डा, शिवराज सिंह चौहान, निर्मला सीतारामण, कुमारस्वामी, मनोहर लाल खट्टर , डॉ. एस. जयशंकर, धर्मेंद्र प्रधान, जीतन राम मांझी, राजीव रंजन सिंह , पीयुष गोयल, सर्वानंद सोनोवाल, डॉ.वीरेंद्र कुमार, के राममोहन नायडू, वीरेंद्र खटीक, ज्योतिरादित्य शिंदे, अश्विनी वैष्णव, गिरीराज सिंह, जुएल ओराम, भुपेंद्र यादव, हरदीप सिंह पुरी, किरेन रिजुजू, गजेंद्र सिंह शिखावत, अन्नपूर्णा देवी, चिराग पासवान, गंगापूरम किशन रेड्डी, डॉ. मनसुख मांडविया, सी आर पाटील

स्वतंत्र प्रभार राज्यमंत्री

प्रताप राव जाधव, जयंत चौधरी, इंद्रजित सिंह राव, अर्जुन राम मेघवाल, जितेंद्र सिंह

### कोण-कोणत्या नेत्यांना संधी?

**मोदी कॅबिनेट ३.० मध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यासह ७२ मंत्र्यांचा समावेश असून यामध्ये ३० केंद्रीय मंत्री, ३६ राज्यमंत्री, ५ स्वतंत्र प्रभार असलेले राज्यमंत्री यांचा समावेश आहे.**

मंत्रिमडळात कोणत्या पक्षाला किती पदं? भाजप - ६०, शिवसेना - १, तेलगू देसम पक्ष - २, जेडीयू - २, जेडीएस - १, आरपीआय - १, आरएलडी - १, अपना दल - १, लोक जनशक्ती पार्टी - २, हिंदूस्थान आवाम मोर्चा - १

### राज्य मंत्री - ३६

**रामदास आठवले, रक्षा खडसे , मुरलीधर मोहोळ, जितिन प्रसाद, पंकज चौधरी, अनुप्रिया पटेल, एसपी सिंह बघेल, कीर्तिवर्धन सिंह, बीएल वर्मा, कमलेश पासवान, रामनाथ ठाकुर, नित्यानंद राय, सतीश दुबे, राजभूषण चौधरी, नीमूबेन बमभानिया, एल मुरुगन, दुर्गादास उइके, सवित्री ठाकुर, वी सोमन्ना, शोभा करांदलाजे, कृष्णपाल गुर्जर, पवित्रा मार्गेरिटा, भूपती राजू, श्रीनिवास वर्मा, भागीरथ चौधरी, संजय सेठ, बंडी संजय कुमार, श्रीपद यशो नाइक, शांतनु ठाकुर, सुकांता मजूमदार, सुरेश गोपी, जॉज कुरियन, अजय टम्टा, रवनीत सिंह बिट्टू,**

# मंत्रिपद न मिळाल्यानं खदखद, NCP मध्ये ऑल इज नॉट वेल?

**मुंबई :** नरेंद्र मोदींनी सलग तिसऱ्यांदा पंतप्रधानपदाची शपथ घेतली. त्यांच्यासोबत ७१ खासदारांनी मंत्रिपदाची शपथ घेतली. यातील ३० जण कॅबिनेट मंत्री, ३६ जण राज्यमंत्री असतील, तर ५ जणांकडे स्वतंत्र प्रभार असेल. भाजपला लोकसभेत बहुमत नसल्यानं मित्रपक्षांच्या साथीनं मोदी सत्तेवर आले आहेत. त्यामुळे मंत्रिमंडळात मित्रपक्षांना वाटा देण्यात आलेला आहे. शिंदेसेना आणि रिपाईंला प्रत्येकी एक मंत्रिपद देण्यात आलेलं आहे. पण अजित पवारांच्या राष्ट्रवादीला एकही मंत्रिपद नाही.

लोकसभेत केवळ एक खासदार असलेली राष्ट्रवादी कॅबिनेटसाठी आग्रही होती. पण भाजपनं त्यांना राज्यमंत्रिपद देऊ केलं. भाजपची ऑफर राष्ट्रवादीकडून फेटाळण्यात आली. राज्यसभेचे खासदार असलेले प्रफुल पटेल यांनी याआधी कॅबिनेट मंत्रिपद भूषवलेलं असल्यानं त्यांना राज्यमंत्रिपद नको, ते त्यांचं अवमूल्यन ठरेल, अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसकडून घेण्यात आली. प्रफुल पटेल वरिष्ठ नेते असल्याचं उपमुख्यमंत्री आणि राष्ट्रवादी काँग्रेसचे अध्यक्ष अजित पवार यांनी सांगितलं.

'आम्हाला केंद्रात कॅबिनेट मंत्रिपद द्या किंवा आम्ही त्यासाठी वाट पाहू. पण आम्ही एनडीएला पाठिंबा देऊ. एनडीए सोडण्याचा प्रश्नच येत नाही,' अशी भूमिका राष्ट्रवादी काँग्रेसकडून घेण्यात आली आहे. राष्ट्रवादी काँग्रेसला कॅबिनेट मंत्रालय नाकारण्यामागे संख्याबळाचं कारण आहे. लोकसभा निवडणुकीत अजित पवारांच्या पक्षाला ४ जागा मिळाल्या. पैकी केवळ एका जागेवर त्यांना यश मिळालं. पक्षाचे प्रदेशाध्यक्ष सुनील तटकरेंनी त्यांची खासदारकी टिकवली. ते रायगडमधून विजयी झाले.

लोकसभा निवडणुकीत विजयी झालेल्या तटकरेंना केंद्रात मंत्रिपद द्यायला हवं होतं, अशी भावना राष्ट्रवादी काँग्रेसच्या एका गटाची होती. रायगडमधून सलग दोनदा विजयी झालेल्या तटकरेंना राज्यमंत्रिपद (स्वतंत्र प्रभार) मिळालं असतं, तर त्याचा पक्षाला फायदाच झाला असता. विधानसभा निवडणुकीत पक्ष अधिक ताकदीनं लढला असता, असा एक मतप्रवाह राष्ट्रवादीत होता असं कळतं.

'सध्या लोकसभेत आमचा केवळ एक खासदार आहे. पण राज्यसभेतही आमचा एक खासदार आहे. याशिवाय पुढच्या काही महिन्यांमध्ये आम्ही आणखी दोघांना राज्यसभेवर पाठवू. त्यामुळे आमचे चार खासदार होतील,' अशी आकडेवारी अजित पवारांनी मांडली. महायुतीचा विचार केल्यास राज्यात भाजपचे ९, शिंदेसेनेचे ४ खासदार आहेत. विशेष म्हणजे ७ खासदार असलेल्या शिंदेसेनेला राज्यमंत्रिपद देण्यात आलेलं आहे. प्रतापराव जाधवांनी राज्यमंत्रिपदाची शपथ घेतली आहे. त्यामुळे केवळ १ खासदार असलेल्या राष्ट्रवादीला कॅबिनेट मंत्रिपद मिळणं अवघड आहे.

# विधानसभेसाठी राष्ट्रवादी अजित पवार गटाची ८० जागांची मागणी

**जळगाव :** राष्ट्रवादी अजित पवारगट विधानसभेच्या ८० जागा लढविण्यासाठी इच्छूक आहे. यामध्ये जळगाव जिल्ह्यातील चार जागांचा समावेश आहे. महायुतीच्या नेत्यांशी चर्चा करून यावर कमी-अधिक काय असेल तो निर्णय होईल, असे पक्षाचे नेते आणि राज्याचे मदत व पुनर्वसन मंत्री अनिल पाटील यांनी माध्यमांशी बोलताना सांगितले. त्यांच्या हस्ते रविवारी, पक्षाच्या नवीन कार्यालयाचे उद्घाटन शिव कॉलनीजवळ करण्यात आले. यावेळी ते बोलत होते.-

लोकसभेनंतर येणाऱ्या विधानसभा निवडणुकांत काय भूमिका राहील या प्रश्नावर बोलताना अनिल पाटील म्हणाले, की महायुतीमध्ये असताना किंवा नसताना हा विचार करण्याची आवश्यकता नाही. जे निकष ठरले आहेत, त्यानुसार छगन भुजबळांनी ९० जागांची मागणी मागच्या मेळाव्यात केली असली, तरी किमान ८० जागा राष्ट्रवादीने लढविल्या पाहिजेत, अशी आमची मागणी आहे. शक्य त्या ठिकाणी सर्वे क्षण, निवडून येण्याची क्षमता तपासून उमेदवारी किंवा जागेची घोषणा केली पाहिजे आणि त्यासाठी आतापासूनच कामाला लागले पाहिजे. यामध्ये जळगाव जिल्ह्यातील ४ जागा, नंदुरबार २, धुळे २ याप्रमाणे उत्तर महाराष्ट्रात आठ जागांची अपेक्षा आहे, असे अनिल पाटील यांनी सांगितले.

### भाजपाच्या विजयात आमचा सिंहाचा वाटा.

**..लोकसभा निवडणुकीत पक्षाचा प्रत्येक कार्यकर्ता महायुती उमेदवाराच्या पाठिशी खंबीरपणे उभा राहिला. प्रत्येक विधानसभा क्षेत्रात तालुकाध्यक्ष व सहकाऱ्यांनी उत्कृष्ट काम केले म्हणून उत्तर महाराष्ट्रात आठपैकी दोन जागा महायुतीच्या निवडून आल्या आहेत. या विजयात भाजप, शिवसेना यांच्या बरोबरीने राष्ट्रवादीअजित पवारगटाचाही सिंहाचा वाटा आहे.**




कॅबिनेट मंत्रीपदाबाबत विचार होईलदेशात एनडीएचे जे सूत्र ठरले आहे, त्यामध्ये एकाच पक्षाला वेगळा न्याय देणे त्यांना कदाचित उचित वाटले नसेल. यापूर्वी प्रफुल्ल पटेल यांनी केंद्रात मंत्री म्हणून चांगले काम सांभाळले. त्यांनी उपमंत्री किंवा राज्यमंत्री म्हणून काम करणे योग्य नाही. पटेल व सुनील तटकरे दोन्ही नेते सक्षम आहेत. म्हणून कॅबिनेट मंत्रीपदाची मागणी करण्यात आली होती. येणाऱ्या काळात प्राधान्याने विचार होईल, अशी अपेक्षा अनिल पाटील यांनी व्यक्त केली.

### सिंधुदुर्ग जिल्ह्याला रेड अॅलर्ट

**मुंबई :** मुंबईमध्ये रविवारी मान्सूनचे आगमन झाल्यानंतर, पहिलाच तडाखा पश्चिम उपनगरांतील तुरळक भागांना बसला. मुंबईत दिवसभरात पाऊस पडला नाही, मात्र पहाटे मेघगर्जनेसह आलेल्या पावसामुळे दहिसरमध्ये काही भागात पाणी तुंबले.

मुंबईमध्ये, सोमवारी तुरळक ठिकाणी मेघगर्जनेसह पावसाचा इशारा देण्यात आला आहे, तर ठाणे जिल्ह्याला ऑरेंज अॅलर्ट देण्यात आला आहे. पुणे विभागामध्ये दोन दिवस पावसाचा धुमाकूळ सुरूच असून, सोमवारी सिंधुदुर्ग जिल्ह्याला रेड अॅलर्ट आहे तसेच कोल्हापूर जिल्ह्यातील घाट परिसरातही तुरळक ठिकाणी अति तीव्र मुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

# विधान परिषदेच्या शिक्षक-पदवीधर निवडणुकीसाठी आयोगाचा मोठा निर्णय



**मुंबई :** राज्यात येत्या २६ जून रोजी होणाऱ्या विधान परिषदेच्या शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांच्या निवडणुकीसाठी अतिरिक्त वेळ देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय केंद्रीय निवडणूक आयोगाने घेतला आहे. या नव्या निर्णयानुसार, मतदारांना संध्याकाळी ६ वाजेपर्यंत मतदान करता येणार आहे. ही वेळ वाढवण्यासंदर्भात शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे उमेदवार अनिल परब यांनी मागणी केली होती.

मुंबईसह कोकण आणि नाशिक येथील शिक्षक आणि पदवीधर मतदारसंघांसाठी येत्या २६ जून रोजी निवडणूक होणार आहे. या निवडणुकीसाठी आयोगाने वेळापत्रक जाहीर केले असून सकाळी ८ वाजल्यापासून दुपारी ४ वाजेपर्यंत मतदान करण्याची वेळ देण्यात आली होती. मात्र यावर आक्षेप घेत शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अनिल परब यांनी निवडणूक आयोगाचे दार ठोठावले होते.

ठाकरे यांच्या शिवसेनेची ही मागणी मान्य करताना केंद्रीय निवडणूक आयोगाने मतदानाचा कालावधी सकाळी ७ ते संध्याकाळी ६ वाजेपर्यंत निश्चित केला आहे. यापूर्वी हा कालावधी सकाळी ८ ते दुपारी ४ वाजेपर्यंत होता.

'या निवडणुकीत मतदानासाठी कोणतीही सार्वजनिक सुट्टी नाही. त्यामुळे मतदारांना त्यांचा लोकशाही हक्क बजावणे कठीण झाले आहे. त्यामुळे ते मतदानाच्या त्यांच्या घटनात्मक अधिकारापासून वंचित राहतील. त्यामुळे निवडणुकीत मतदान कमी होऊ शकते. या पार्श्वभूमीवर, मतदानाची वेळ वाढवणे गरजेचे होते. आयोगाने आमची मागणी पूर्ण केली असून याचा फायदा मतदानाची टक्केवारी वाढण्यासाठी होईल,' असा विश्वास अनिल परब यांनी व्यक्त केला.

# राष्ट्रवादीचा आज नगरमध्ये विजयी मेळावा

## शरद पवारांसह नवनिर्वाचित खासदार लावणार हजेरी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष शरद पवार गटाचा वर्धापन दिन आज सोमवार (दि.१०) रोजी नगरमध्ये होणार आहे. यानिमित्ताने लोकसभा निवडणुकीतील यशाचा विजयी मेळावा होणार असल्याची माहिती राष्ट्रवादीच्या शरद पवार गटाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र फाळके यांनी दिली. या मेळाव्यास पक्षाचे अध्यक्ष ज्येष्ठ नेते शरद पवार यांच्यासह पक्षाचे लोकसभा निवडणुकीत निवडून आलेले सर्व खासदार उपस्थित राहणार आहेत.

१० जूनला वर्धापन दिनी नगर शहरात राज्यस्तरीय कार्यक्रम घेण्याचा मान नगर राष्ट्रवादीला मिळाला आहे. या वर्धापन दिनी नगरमध्ये मोठा मेळावा घेणार असून लोकसभा निवडणुकीत नगरला मिळालेल्या विजयानंतर नगर शहरात पहिला विजय मेळावा यानिमित्ताने होणार आहे. विजयोत्सव साजरा करणे व आगामी विधानसभा निवडणूक हाच या मेळाव्याचा अजेंडा आहे, असे फाळके यांनी यावेळी स्पष्ट केले.

राष्ट्रवादी पक्षाची स्थापना १० जून १९९९ रोजी करण्यात आली. दरवर्षी पक्षाचा वर्धापन दिन साजरा केला जातो. यंदा रौप्यमहोत्सवाचा मान नगरकरांना मिळाला.

आज सायंकाळी ५ वाजता न्यू आर्ट्स कॉमर्स व सायन्स कॉलेज, नगर याठिकाणी हा सोहळा होणार आहे. या सोहळ्यासाठी पक्षाचे नेते शरद पवार, प्रदेशाध्यक्ष जयंत पाटील, खासदार सुप्रिया सुळे, आ. जितेंद्र आव्हाड, अंकुश काकडे, माजी खासदार प्रसाद तनपुरे, माजी आमदार दादाभाऊ कळमकर यांच्यासह राज्यातील पक्षाचे वरिष्ठ पदाधिकारी, आमदार, खासदार उपस्थित राहणार आहेत. या सोहळ्यात नूतन सर्व खासदारांसमवेत लंके यांचाही सन्मान केला जाणार आहे.

या महोत्सवासाठी जिल्ह्यातील कार्यकर्त्यांनी, पदाधिकार्यांनी आणि जनतेने उपस्थित रहावे, असे आवाहन नवनिर्वाचित खा. लंके, आ. प्राजक्त तनपुरे, आ. रोहित पवार, माजी आ. राहुल जगताप, सरचिटणीस प्रताप ढाकणे, शहर जिल्हाध्यक्ष अभिषेक कळमकर आदींनी केले आहे.

# भाजप नेते फडणीस यांच्या बचाव करण्यास महायुतीचे आमदार नाखुश..?

**सातारा :** महाराष्ट्राच्या राजकारणात दोन वेळा भूकंप घडवून सत्ता मिळवून देणारे भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांना आता लोकसभेच्या निवडणूक निकालावरून टार्गेट केले जात आहे. या लढवय्या नेत्याचा बचाव करण्यास महायुतीचे आमदार नाखुश असल्याचे चित्र दिसू लागले आहे. यशाला सर्व वाटेकरी असतात पण अपयशामध्ये कुणी नसतं. याचा सध्या उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे अनुभव घेत आहेत.नागपूरच्या रेशम बागेतील हे कमळाचे फुल अनेकदा टवटवीत झाले होते. राजकारणामध्ये अनेकांवर त्यांनी आरोप केले पण हे आरोप सिद्ध करण्यासाठी जे लागणारे पुरावे आहेत. ते त्यांच्यापर्यंत पोहोचले नाहीत किंवा ते लपून राहिलेले आहेत. असा आजही त्यांच्याबद्दल बोलताना जाणवत असते. खरं म्हणजे देवेंद्र फडणवीस हे खऱ्या अर्थाने जानव्यातून बाहेर पडणारे नेते आहेत. त्यांच्या वर्चस्वाला धक्का लावण्याचेच काम पक्षातूनच सुरू झालेले आहे. हे सुद्धा आता लपून राहिलेले नाही.एकेकाळी या लढाऊ नेत्याचे नाव घेऊन पश्चिम महाराष्ट्रातील अनेक नेत्यांनी भाजपमध्ये प्रवेश केला. खासदारकी आमदारकी मिळवली. आता देवेंद्र फडणवीस यांच्यावर चोहीबाजूने टीका होत असताना त्यांचे निकटवर्तीय समजणारे भाजपचे दिग्गज मंडळी मौन धारण करीत आहेत. साताऱ्यातील आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार जयकुमार गोरे, आमदार महेश शिंदे हे त्रिमूर्ती खऱ्या अर्थाने उपमुख्यमंत्री फडणवीस यांचेच नेतृत्व मानतात. असे अनेकदा सिद्ध झालेले आहे .आता मात्र या तिन्ही आमदारांनी याबाबत अद्यापही स्पष्ट भूमिका प्रसारमाध्यमासमोर मांडलेली नाही. मुख्यमंत्री एकनाथ शिंदेंनी शिवसेनेतील ३९ आमदारांसह शिवसेनेतून बंड करण्याचे धाडसी पाऊल टाकले होते. भाजपसोबत सरकार स्थापन केलं. महायुतीच्या माध्यमातून महाराष्ट्र राज्यात मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याच हाती राज्याचा कारभार असतानाच राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे दुसरे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांचा सुद्धा समावेश करण्यात आला.

महविकास आघाडीच्या नेत्यांकडून सातत्याने शिंदे- पवार -फडणवीसांवर टीकाही सुरू झाली . अखेर महाराष्ट्रातील शिंदे-फडणवीस यांनी दिनांक ९ ऑगस्ट रोजी काही मंत्र्यांची शपथविधी घेऊन त्यांचाही सत्तेत समावेश केला. याला चाणक्य नीति म्हणून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यात नाव घेतले जात होते. यापूर्वी देवेंद्र फडणवीस यांनी २०१४ ते २०१९ या काळात महाराष्ट्राचे अठरावे मुख्यमंत्री म्हणून काम केले. देवेंद्र फडणवीस यांच्या सक्षम आणि दूरदर्शी नेतृत्व आहे. बहुजन समाजातील अनेक नेत्यांशी त्यांची राजकीय नाळ जुळलेली आहे. सातारा जिल्ह्याचा विचार केला तर आमदार शिवेंद्रसिंहराजे भोसले, आमदार जयकुमार गोरे, आमदार महेश शिंदे व भाजपचे काही महत्त्वाचे नेते यांच्याबरोबरच नवनिर्वाचित खासदार श्रीमंत छत्रपती उदयनराजे भोसले यांच्याशी त्यांची चांगली मैत्री आहे. भाजप नेते व महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस कायद्यातील पदवी, उद्योग व्यवस्थापन या विषयात पदव्युत्तर पदवी आणि बर्लिनमधल्या डीएसई संस्थेमधून प्रकल्प व्यवस्थापन या विषयात पदविका प्राप्त केली आहे. १९९२ साली त्यांनी राजकीय कारकिर्दीला सुरुवात झाली. भारतातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वात तरुण नागपूरचे महापौर होण्याचा मान त्यांनी पटकावला. ड्डमेयर इन कौन्सिलफ या पदावरही त्यांनी चांगले काम केले आहे.

आज महाराष्ट्रातील लोकसभेच्या निवडणुकीच्या अनुषंगाने त्यांच्यावर टीकाटिपणी सुरू झालेली आहे. महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री पदावरून त्यांना मुक्त करून त्यांना भाजपच्या पक्ष पातळीवर काम करण्यास रस असल्याचे त्यांनी जाहीर केले आहे. पण, निवडणुकीतील पराभव मुळे त्यांचा राजीनामा घेणे म्हणजे भाजपला कमीपणा वाटत आहे. एकेकाळी भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस यांची भेट घेण्यासाठी ताटकळत असणारे अनेक आमदार खासदार आता त्यांच्यापासून दूर जावे लागले आहेत. एका पराभवाने राजकीय कारकीर्दीला घरघर लागत असते. याचा अनुभव आता भाजपचे नेते देवेंद्र फडणवीस घेत आहेत .

राजकीय वैभव प्राप्त करून देण्यासाठी अनेकांबद्दल त्यांनी त्यांनी रान उठवले होते. आज तेच काही मंत्री ,खासदार- आमदार हे देवेंद्र फडणवीस यांच्यापासून राजकीय लाभ मिळणे कठीण बनले आहे. हे ओळखून आता आपले गुरु व मित्र बदलू लागलेले आहेत. याची आता राजकारणात चांगलीच चर्चा रंगू लागलेली आहे. विधानसभा निवडणुकीला सहा महिन्याचा अवधी असून उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित दादा पवार यांची युती मतदारांना मानवलेली नाही. त्यामुळे सध्या मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना सॉफ्ट कॉर्नर मिळत आहे. हे मात्र सिद्ध झाले आहे.


# राज्यात डेंग्यूचा धोका वाढला

## गेल्या वर्षीच्या तुलनेत रुग्णसंख्या दीडपट; पालघर, कोल्हापूरमध्ये जास्त प्रमाण

**पुणे :** पावसाळ्याचा तोंडावर राज्यात डेंग्यूचा प्रार्दुभाव वाढला आहे. यंदा जानेवारी ते ७ मे या कालावधीत डेंग्यूचे १ हजार ७५५ रुग्ण आढळले आहेत. गेल्या वर्षीच्या तुलनेत यंदा रुग्णसंख्या दीडपट झाली असून, सर्वाधिक रुग्ण पालघर जिल्ह्यात आढळले आहेत. त्याखालोखाल कोल्हापूर, अकोला, नांदेड आणि सोलापूर या जिल्ह्यांत रुग्णांचे प्रमाण जास्त आहे.

राज्यात यंदा जानेवारी ते ७ मे या काळात डेंग्यूचे १ लाख २७ हजार १४० संशयित रुग्ण आढळले. गेल्या वर्षी याच कालावधीत ही संख्या ८१ हजार ७३१ होती. यंदा निदान झालेल्या डेंग्यू रुग्णांची संख्या १ हजार ७५५ आहे. गेल्या वर्षी ही संख्या १ हजार २३७ होती. गेल्या वर्षीचा तुलनेत रुग्णसंख्या यंदा दीडपट आहे. राज्यभरात यंदा १ लाख ८८ हजार ८३४ संशयित रुग्णांची डेंग्यूची चाचणी करण्यात आली आहे. यंदा राज्यभरात आतापर्यंत डेंग्यूमुळे एकही मृत्यू झालेला नाही. गेल्या वर्षी मात्र या कालावधीत एका रुग्णाचा मृत्यू झाला होता, अशी माहिती आरोग्य विभागाचे संहसंचालक डॉ. राधाकिशन पवार यांनी दिली.

राज्यात सर्वाधिक १७४ डेंग्यूचे रुग्ण पालघर जिल्ह्यात आढळले आहेत. त्याखालोखाल कोल्हापूर जिल्हा ११७, अकोला जिल्हा ७१, नांदेड जिल्हा ५८, सोलापूर जिल्हा ५१ अशी रुग्णसंख्या आहे. राज्यातील महापालिकांचा विचार करता मुंबई महापालिकेत सर्वाधिक २८५ रुग्णसंख्या आहे. त्याखालोखाल नाशिक महापालिका ७९, कोल्हापूर महापालिका ४५, सांगली महापालिका ४१ आणि पनवेल महापालिका ३८ अशी रुग्णसंख्या आहे.



**आरोग्य विभागाचे जनजागृतीचे पाऊल**

आरोग्य विभागाने राष्ट्रीय किटकजन्य रोग नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जून हा हिवताप प्रतिरोध महिना जाहीर केला आहे. या महिन्यात हिवताप, डेंग्यू, चिकुनगुन्या, झिका, चंडीपुरा आणि हत्तीरोग या आजारांविषयी समाजात जनजागृती केली जात आहे. याचबरोबर किटकजन्य आजारांच्या प्रतिबंधासाठी सूक्ष्म कृती आराखडा तयार करण्यात आला आहे. त्यानुसार आरोग्य विभागांकडून उपाययोजनांची अंमलबजावणी केली जात आहे, असे डॉ. राधाकिशन पवार यांनी सांगितले.

## संपादकीय

# बहुमत मिळवताना बेजार!

चुकीची घोषणा पुढची पाच वर्षं विरोधी बाकांवर बसवू शकते. घोषणा कितीही आकर्षक असली, तरी तिला वास्तवाचा आधार लागतोच. अन्यथा, सत्तेची स्वप्ने पत्त्यांच्या बंगल्यांसारखी कोसळू शकतात. एखादी घोषणा यशस्वी होते, तेव्हा ती आपण सर्वप्रथम दिल्याचे दावे अनेकजण करतात; पण 'चारसौ पार'च्या बाबतीत ही शक्यता मोदी यांनी मोडीत काढली होती. जनतेनेही ती मोडीत काढून तीनशेच्या आत आणून ठेवली. संसदीय लोकशाही पद्धतीत सत्ताधारी पक्ष आणि तितकाच प्रबळ विरोधी पक्ष हवा असतो. तसे झाले नाही, तर सत्ताधारी पक्षाची एकाधिकारशाही सुरू होते आणि नंतर तो हुकूमशाहीकडे वाटचाल करू लागतो.भारतीय जनता पक्षाने यापूर्वी 'काँग्रेसमुक्त भारत' आणि नंतर 'विरोधी पक्षमुक्त भारत' अशी घोषणा दिली होती. जनतेच्या करातून मिळालेला पैसा निवडणुकीच्या अगोदर सत्ताधारी पक्ष आपली प्रतिमा उजळण्यासाठी घालवत असेल तर त्याची प्रतिक्रिया उमटतेच. महाराष्ट्रात सरकारचे विकासाचे गोडवे गाणारे रथ गावोगावी याच कारणासाठी रोखले जात होते. काहींनी तर थेट विकासकामांबाबत माहिती देता, की भाजपचा प्रचार करता असा सवाल केला होता.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी 'अबकी बार, चारसौ पार'ची घोषणा केल्यानंतर त्याला पुढे यमक जोडून 'चारशे पार नव्हे, तडीपार' अशी घोषणा काही नेत्यांनी केली होती. विरोधकांना एखाद्या घोषणेतील कच्चे दुवे दिसले, तर प्रचार मोहिमेसाठी ओतलेला सगळा पैसा पाण्यात जाण्याची भीती असते. भाजपच्या नेतृत्वातील राष्ट्रीय लोकशाही आघाडीला चारसौ पारपासून तीनशेच्या आत जागा मिळण्यापर्यंतचा प्रवास कसा झाला, हे समजून घेतले पाहिजे. काँग्रेसला चाळीसही जागा मिळणार नाहीत, असे म्हणणार्यांना मतदारांनीच चपराक दिली. 'इंडिया आघाडी'ने अपक्षेपेक्षा मोठी उसळी घेतल्याने भाजपला मोठा धक्का बसला आहे. मोदी यांची लाट ओसरल्याचे आणि मोदी यांच्या 'हमींवरचा' लोकांचा विश्वासही कमी झाल्याचे निष्कर्ष निवडणुकीच्या निकालातून निघतात. नितीशकुमार आणि चंद्राबाबू नायडू यांना आता 'एनडीए'मध्ये जास्त महत्त्व येण्याची शक्यता आहे; परंतु त्यांनाही मनोमन 'इंडिया' आघाडीशी जुळवून घेतले असते, तर बरे झाले असते, असे आता वाटत असेल.

'इंडिया'आघाडी बांधण्यात सुरुवातीला पुढाकार घेणारे नितीशकुमार यांना आता आपला निर्णय चुकला, असे वाटत असेल. नितीशकुमार आणि चंद्राबाबू या दोघांशीही चांगले संबंध असल्याने भाजपला सत्तेपासून दूर ठेवण्यासाठी शरद पवार यांनी या दोघांशीही संपर्क साधून बरोबर येण्याचे साकडे घातले. महायुती आणि 'इंडिया' आघाडीतील अन्य कुणी कुठे जाणार नाहीत; परंतु या दोघांमुळे सत्तेचे पारडे बदलू शकते. पवार यांनी त्यांना विशेष राज्याच्या सवलतीसह अन्य मागण्या मान्य करण्याची ग्वाही दिल्याने आता या दोघांच्या भूमिकेवर सत्तेचा कौल कुणाकडे हे ठरू शकेल. विशेष म्हणजे ज्या पाच राज्यांवर भाजपची मदार होती, त्याच राज्यांत भाजपला मोठा दणका बसला.उत्तर प्रदेश, तेलंगण, महाराष्ट्र, कर्नाटक, राजस्तान, आणि पश्चिम बंगालमध्ये भाजपला मोठा फटका बसला. महाराष्ट्रासह अन्य राज्यांमध्ये जागा घ्घटने अपेक्षित होते; परंतु 'क्लीन स्वीप'ची स्वप्ने पाहणार्या राजस्तान आणि उत्तर प्रदेशाने कमाल केली. अखिलेश यादव , राहुल गांधी, ममता बॅनर्जी, शरद पवार, उद्धव ठाकरे यांनी भाजपच्या 'चारसौ पार'च्या घोषणेला सुरुंग लावला. उत्तर प्रदेशशामध्ये भाजपला गेल्या वेळेपक्षा निम्म्याही जागा मिळाल्या नाहीत. अयोध्येत राम मंदिर उभारल्यानंतर मोदी सरकारला मोठा फायदा होईल असे चित्र होते; परंतु भाजपला राम काही पावला नाही. भाजपने राजस्तानमध्ये २०१९ मध्ये सर्व जागा जिंकल्या होत्या. या वेळीही काँग्रेसला एखाद-दुसरी जागा मिळण्याचा अंदाज होता. तिथे काँग्रेसने आठ जगा जिंकल्या आणि मार्क्सवादी कम्युनिस्ट पक्षाने एक जागा जिंकून भाजपला चकित केले. भाजपने सर्वाधिक लक्ष पश्चिम बंगालवर केंद्रित केले होते. तेथे भाजप किमान २२ जागा जिंकेल, असे सांगितले जात होते; परंतु प्रत्यक्षात मुख्य मंत्री ममता बॅनर्जी भाजपला पुरून उरल्या.त्यांनी तब्बल ३० जागा जिंकल्या. संदेशखळी, इतर मागासांची प्रमाणपत्र रद्द करण्याचा निर्णय, शिक्षक भरती गैरव्यवहार असे कुठलेही मुद्दे तिथे भाजपच्या मदतीला आले नाहीत. 'चारसौ पार'च्या या घोषणेने भाजपचा फायदा होण्यापेक्षा जास्त नुकसान केले. या घोषणेमुळे भाजप कार्यकर्त्यांचा अतिआत्मविश्वास वाढला आणि त्यांनी मतदारांना वळवण्यासाठी फारसे प्रयत्न केले गेले नाहीत. उत्तर प्रदेशामध्ये तर भाजपने भाकरी फिरवलीच नाही. ज्यांच्यावर आरोप होते, ज्यांच्याविषयी नाराजी होती, त्यांनाच पुन्हा उमेदवारी दिली गेली. इतरांवर घराणेशाहीचे आरोप करत असताना मोदी आणि भाजपच्या नेत्यांनीच घराणेशाही जोपासली.

अ भाजपने राज्यातील बहुतांश जागांवर उमेदवारांची पुनरावृत्ती केली होती. यामुळे जनतेने नाराजी मतपेटीतून दाखवली. ईशान्य क्षेत्र वगळता दिल्लीतील सर्व जागांवर भाजपने उमेदवार बदलले. तिथे त्याचा थेट फायदाही झालेला दिसतो. महाराष्ट्र, राजस्तान आणि उत्तर प्रदेशामध्ये उमेदवार बदलण्याचे प्रमाण कमी होते. बहुजन समाज पक्षाला गेल्या वेळी दहा जागा मिळाल्या होत्या. या वेळी त्यांची स्वबळाची चाल पक्ष संपवण्याच्या दिशेने घेऊन गेली. भाजपला त्याचा फायदा झाला नाही. मायावती यांचा हेतू लक्षात आल्याने लोकांनी ती मते 'इंडिया' आघाडीला देणे पसंत केले. न्यायालयाचा आदेश डावलून आरोप असलेल्यांची बांधकामे उद्ध्वस्त करण्याचा आदित्यनाथ सरकारचा निर्णय सामान्यांना अजिबात पसंत नव्हता. २०१९ च्या निवडणुकीत मायावती यांच्या पक्षाने १० जागा जिंकल्या होत्या. या वेळी मायावती यांच्या पक्षाची मतांची टक्केवारी दहाच्या आत आली. गेल्या निवडणुकीत समाजवादी पक्षाला केवळ १८ टक्के मते मिळाली होती, ती यावेळी ३१ टक्के झाली. म्हणजेच या वेळी बसपची मते सपच्या खात्यात गेल्याचे स्पष्ट दिसले. हरयानामध्ये भाजपच्या जागा कमी झाल्या. काँग्रेसला तिथे चांगल्या जागा मिळाल्या. हरयाना हा भाजपचा बालेकिल्ला मानला जातो. मात्र पंजाब आणि हरयानाच्या शेतकर्यांचे आंदोलन आणि सोयबीनच्या प्रश्नाकडे दुर्लक्ष करणे भाजपला भोवले. भाजपच्या निगरगट्ट भूमिकेमुळेच पारंपरिक मतदार काँग्रेसकडे वळला, असे म्हणायला जागा आहे. पंजाबमध्ये भाजपचे मोठे नुकसान झाले.

कर्नाटकामध्ये धर्मनिरपेक्ष जनता दलाबरोबरची युती फायद्यात ठरण्याऐवजी भाजपचे मोठे नुकसान करून गेली. भाजपने गेल्या निवडणुकीमध्ये कर्नाटकमधील २८ पैकी २६ जागा जिंकल्या होत्या. मात्र माजी पंतप्रधान एच. डी. देवेगौडा यांचे चिरंजीव आणि नातवाने महिलांचे लैंगिक शोषण केले. खासदार प्रज्वल रेवण्णा पराभूत झाला; परंतु त्याचबरोबर त्याच्यासाठी प्रचार करणार्या मोदी यांनाही कर्नाटकाच्या जनतेने झटका दिला. ऐन निवडणुकीत हे प्रकरण बाहेर येऊनही रेवण्णा प्रकरणावर भाजपने पाहिजे तशी कारवाई केली नाही. उत्तर प्रदेशानंतर महाराष्ट्रात लोकसभेच्या सर्वाधिक जागा आहेत. इथे भाजप आणि त्याच्या मित्रपक्षांनाही मोठा फटका बसला. शिवसेना आणि राष्ट्रवादी पक्ष फोडल्याचा फायदा भाजपला झाला नाही. उलट, उद्धव ठाकरे आणि शरद पवार यांना सहानुभूती मिळाली, हे ताज्या निकालांमधून स्पष्ट झाले. - भागा वरखडे

# फलटणकरांचे प्रेम कधीही विसरणार नाही : रणजितसिंह ना. निंबाळकर

## तालुक्याचा आशीर्वाद माझ्यासोबतच



**फलटण** : लोकसभा निवडणुकीत झालेल्या पराभवाने मी खचणार नाही. माझ्यावर प्रेम करणाऱ्या कार्यकर्त्यांसाठी दिवस रात्र उपलब्ध राहणार असून फलटणच्या जनतेने १७ हजारांचे मताधिक्य दिले आहे. फलटणकरांचे प्रेम मी कधीच विसरू शकत नाही. केंद्रात, राज्यात भाजपचे सरकार आहे. भाजपच्या माध्यमातून कार्यकर्त्यांची विकास कामे करतच राहणार आहे. कार्यकर्त्यांनो नाउमेद होऊ नका. मी सदैव तुमच्या सोबत आहे. येत्या दोन महिन्यांत तुम्हाला निश्चितच गुड न्यूज मिळेल, असे प्रतिपादन माजी खासदार रणजितसिंह नाईक निंबाळकर यांनी केले.

सुरवडी (ता. फलटण) येथील आयोजित कार्यकर्ता बैठकीत ते बोलत होते. यावेळी समशेरसिंह ना. निंबाळकर, अॅड. जिजामाला ना. निंबाळकर, बजरंग गावडे, अनुप शहा, रणजितसिंह भोसले, सचिन कांबळे पाटील, सुशांत निंबाळकर उपस्थित होते.

रणजितसिंह नाईक निंबाळकर म्हणाले, या निवडणुकीमध्ये खांद्याला खांदा लावून काम केलेल्या कार्यकर्त्यांची मी सदैव पाठ राखण करेन; मात्र ज्यांनी माझ्याशी गद्दारी केली आहे त्यांना मी कधीही क्षमा करणार नाही. देशात, राज्यात भाजपचेच सरकार आहे व राहील. त्यामुळे कार्यकर्त्यांनी निर्धास्त रहावे. विकास कामाबद्दल कोणतीही चिंता करू नये. आता मी फलटण तालुक्यासाठी पूर्ण वेळ मोकळा आहे. तालुक्यातील वाडी वस्त्यांवर जाऊन कार्यकर्त्यांच्या माध्यमातून एक नवीन मजबूत फळी तयार करणार आहे. आगामी काळात होणाऱ्या विधानसभेच्या निवडणुकीत फलटण, कोरेगाव मतदारसंघातून भारतीय जनता पार्टीच्या विचाराचा आमदार निवडून आणण्यासाठी तुमच्या सहकार्याने यशस्वी प्रयत्न करणार आहे.

निंबाळकर म्हणाले, बारामतीला पुन्हा पाणी देण्यासाठी राजे गटाने तालुक्याशी गद्दारी केली.

फलटणचे हक्काचे पाणी बारामतीला देऊन आपल्या पदरात एखादे पद पाडून घेण्याचा केविलवाना प्रयत्न होऊ शकतो. मात्र त्यास आपला तीव्र विरोध राहील त्यासाठी काहीही संघर्ष करावा लागला तर आपण मागे हटणार नाही. गावोगावच्या कार्यकर्त्यांनी मतदानासाठी जे ऐक्य दाखवलं ते यापुढे असेच ठेवा, असे आवाहनही त्यांनी केले.



रामदास आठवले यांना तिसऱ्यांदा केंद्रात मंत्रिमंडळात स्थान मिळाल्याबद्दल

# कार्यकर्त्यांनी केला पेढे वाटून आनंदोत्सव

**हडपसर/ पुणे. :** रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया (आठवले ) पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्ष केंद्रीय मंत्री रामदास आठवले साहेब यांची तिस-यांदा केंद्रीय मोदी सरकार मध्ये वर्णी लागल्याने दलित पॅन्थर चे महाराष्ट्र प्रदेश अध्यक्ष यशवंत नडगम पुणे स्टेशन येथील डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास पुष्पहार अपर्ण पेढे वाटप करून फटाक्यांची अतिषबाजी करीत आनंदोत्सव साजरा करण्यात आला.

यावेळी दलित पॅन्थरचे व रिपाइं कार्यकर्त्यांनी जल्लोष केला.आंबेडकर

रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया आठवले गट या पक्षाचे संस्थापक अध्यक्ष रामदास आठवले यांना केंद्रीय मंत्रिमंडळामध्ये तिसऱ्यांदा मंत्रीपद मिळाल्याबद्दल दलित पँथर च्या वतीने जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यास दलित पँथर चे राष्ट्रीय अध्यक्ष यशवंत नडगम यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.

यावेळी यशवंत नडगम म्हणाले की, . डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचाराला रिपाइं व दलित पँथरचे संस्थापक अध्यक्ष नामदेव ढसाळ यांच्या दलित पँथर संघटनेला खऱ्या अर्थाने पुन्हा तिसऱ्यांदा न्याय मिळाला, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या नंतर केंद्रीय मंत्रिमंडळात रामदास आठवले हे दलित चेहरा म्हणून प्रतिनिधीत्व गेले दहा वर्ष झाले करीत आहेत, मोदींचे व भाजप महायुतीचे अभिनंदन असे नडगम म्हणाले.

यावेळी पश्चिम महाराष्ट्र उपाध्यक्ष विशाल ओवाळ. संजय शिंदे. राजकिरण ठोंगे पाटील. संजय पोटभरे. आकाश पायाळ. सोमनाथ. साळवे. सनी कोरे, सनी पंजाबी. अविनाश मोरे. लहू लांडगे. कोंडके शिंदे. जॅक्सन पनेम. पप्पू पाटील. आदी यावेळी उपस्थित होते

# दुष्काळी भागात ओढ्यांना पाणी, शेतकऱ्यांमध्ये आनंद

**सातारा :** जिल्ह्यात मान्सून सक्रिय झाला असून, सर्वत्र कमी-अधिक प्रमाणातपाऊसपडत आहे. तरीही शनिवारी साताऱ्यासह पश्चिम भागात अनेक ठिकाणी धुवाँधारपाऊसपडला. तर पूर्व दुष्काळी भागातही धो-धो पाऊस झाला. यामुळे ओढे भरुन वाहिले. तसेच पुलावरुन पाणी गेल्याने वाहतुकीवरही परिणाम झाला. तर या पावसामुळे बळीराजांत आनंदाचे वातावरण असून खरीप पेरणीला लवकरच सुरुवात होण्याची चिन्हे आहेत.

जिल्ह्यात मागील दोन वर्षांत मान्सूनचा पाऊस १० जूननंतर दाखल झाला. त्यानंतरही पावसाने ओढ दिली होती. त्यामुळे पेरण्यांना उशीर झाला होता. यंदा मात्र मान्सून वेळेवर दाखल झाला आहे. जिल्ह्यात गुरूवारपासूनच पाऊस पडू लागलाय. पश्चिम भागातील कास, बामणोली, तापोळा, महाबळेश्वर, कोयना, नवजा या भागात चांगला होत आहे. तसेच पूर्व भागातील माण, खटाव, फलटण तालुक्यांतीलही अनेक गावांत पावसाने दमदार हजेरी लावली आहे. शुक्रवारी रात्री तर सातारा शहरात विजांच्या कडकडाटात पाऊस पडला. यामुळे नागरिकांना घराबाहेर पडणेही मुश्कील झाले होते. त्यातच शहराच्या अनेक भागातील वीजपुरवठाही खंडित झाला होता.

तर शनिवारी दुपारच्या सुमारासही सातारा शहरासह परिसरात पावसाने जोरदार हजेरी लावली. सुमारे दीड तास पाऊस कोसळत होता. दुपारी साडे तीनच्या सुमारास पाऊस थांबला. पण, त्यानंतरही आभाळ भरुन आले आणि सायंकाळी साडे पाच वाजल्यापासून पुन्हा पावसाला सुरूवात झाली. पावसामुळे शहरातील गटारी भरुन वाहिली. तसेच सर्व रस्त्यावर पाणीच पाणी दिसत होते. सखल भागातही पाणी साचून राहिले.

# 'अंतरंग' कथक नृत्य सादरीकरणाने जिंकली रसिकांची मने !

## भारतीय विद्या भवन,इन्फोसिस फाऊंडेशनचा सांस्कृतिक प्रसार उपक्रम



**पुणे :** भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार उपक्रमांतर्गत 'अंतरंग' या कथक नृत्य सादरीकरण कार्यक्रमाचे आयोजन शनीवार,दि. ८ जून २०२४ रोजी करण्यात आले होते. ज्येष्ठ नृत्यांगना आणि ' नृत्यधाम स्कूल ऑफ परफॉर्मिंग आर्टस् ' च्या संचालिका प्रेरणा देशपांडे यांच्या शिष्या अवंती दातार आणि कल्याणी गोखले यांनी बहारदार एकल (सोलो) कथक नृत्य सादर केले.या सादरीकरणाला उपस्थित पुणेकर रसिकांचा चांगला प्रतिसाद मिळाला.

कार्यक्रमात कथक नृत्याची पारंपारिक ताल प्रस्तुती व भावअंग सादर करण्यात आले. अवंती दातार यांनी राग भैरवीतील वंदनेने कार्यक्रमाची सुरुवात केली. ताल तीन ताल मधील पारंपारिक रचना थाट,आमद, परन ,तिहाई या पारंपारिक रचना सादर केल्या. यानंतर राग तिलक कामोद मधील अभिनय मध्ये कजरी 'सावन की ऋतु आयी रे सजनिया , प्रीतम घर नही आए ' ही रचना सादर केली. राग मारवा मधील चतरंगने त्यांनी समारोप केला.

कल्याणी गोखले यांनी कृष्ण वंदनेने सुरुवात केली. ताल पंचम सवारी मधे पारंपारिक रचना सादर केल्या.चक्रदार परन ,नौ की गिनती,अभिनय मध्ये ठुमरी ' काहे रोकत डगर मेरी नंदलाल ' सादर केली. नटभैरव रागातील तराना ने ' अंतरंग ' नृत्य प्रस्तुतीचा समारोप झाला. तालयोगी सुरेश तळवलकर,ज्येष्ठ तबलावादक रामदास पळसुले , प्रेरणा देशपांडे आदी मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते. ईशान परांजपे ( तबला ), कृष्णा साळुंखे ( पखवाज ) ,शुभम खंडाळकर (गायन ), यशवंत थिटे (हार्मोनिअम ) ,ईश्वरी देशपांडे (पढंत ) यांनी साथसंगत केली. निवेदन मुग्धा हसबनीस यांनी केले.

हा कार्यक्रम शनिवार, दि.८ जून २०२४ रोजी सायंकाळी साडेपाच वाजता भारतीय विद्या भवनचे सरदार महादेव बळवंत नातू सभागृह,(सेनापती बापट रस्ता) येथे झाला.हा कार्यक्रम विनामूल्य होता.भारतीय विद्या भवन आणि इन्फोसिस फाऊंडेशनच्या सांस्कृतिक प्रसार कार्यक्रमांतर्गत सादर होणारा हा २१० वा कार्यक्रम होता. भारतीय विद्या भवनचे मानद सचिव प्रा.नंदकुमार काकिर्डे यांनी कलाकारांचा सत्कार केला.

# कुमारस्वामी यांचे नाथाभाऊ शेवाळे यांच्याकडून अभिनंदन



**पुणे :** जनता दल सेक्युलर पक्षाचे ज्येष्ठ नेते व कर्नाटक राज्याचे माजी मुख्यमंत्री एच.डी.कुमारस्वामी यांची केंद्रीय मंत्रीपदी निवड झाल्याबद्दल महाराष्ट्र जनता दल (सेक्युलर) पक्षाचे प्रदेशाध्यक्ष नाथाभाऊ शेवाळे यांनी आज(रविवारी) त्यांच्या दिल्ली येथील निवासस्थानी भेट घेऊन अभिनंदन केले. यावेळी पक्षाचे प्रधान महासचिव अजमल खान,विद्यार्थी आघाडीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष एड.संग्राम शेवाळे उपस्थित होते. लवकरच महाराष्ट्र दौरा करणार असल्याचे एच.डी. कुमारस्वामी यांनी यावेळी बोलताना सांगितले.

नाथाभाऊ शेवाळे यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात या निवडीबद्दल आनंद व्यक्त करण्यात आला आहे.'केंद्रीय मंत्रीपदावर एच.डी. कुमारस्वामी यांची निवड झाल्याने पक्षात आनंदाचे वातावरण असून महाराष्ट्रातील जनता दल सेक्युलर पक्षाच्या कार्यकर्त्यांना,पदाधिकाऱ्यांना मोठे बळ मिळणार आहे.लवकरच कुमारस्वामी यांच्या उपस्थितीत पक्षाचे महाराष्ट्रात पक्षाचे अधिवेशन आयोजित करण्यात येणार आहे ',असे त्यांनी या पत्रकात म्हटले आहे.

# काळोखातील जगण्याला द्या प्रकाशाचं दान !



१० जून हा दिवस स्वर्गीय डॉक्टर भालचंद्र दृष्टी दान दिवस म्हणून साजरा करण्यात येतो,नेत्रदान संबंधी संमती पत्र भरून देणाऱ्यांची संख्या दिवसेंदिवस वाढत आहे परंतु प्रत्यक्षात नेत्रदान करण्याचे प्रमाण अतिशय संथ गतीने वाढत आहे.प्रत्येकाने योगदान दिल्यास नेत्रदानाच्या प्रमाणात निश्चितचं वाढ होईल,असा विश्वास दौंड येथील महाराष्ट्र नेत्रतज्ञ संघटनेचे सदस्य डॉ. प्रेम कुमार भट्टड यांनी व्यक्त केला.

ते म्हणाले,दृष्टी अभावी ज्यांचे जीवन अंधकारमय आहे अशांचे जीवन आपल्या नेत्रदानामुळे प्रकाशमान होणार असल्याने नेत्रदानाचा संकल्प व त्यासाठी आवश्यक व्यवस्था करणे हिताचे ठरेल.संमती पत्र देणाऱ्या व्यक्तीचा मृत्यू झाल्यानंतर त्यांच्या शोकमग्न कुटुंबास नेत्रदान करण्याची नुसती आठवण करून दिली तर काहींना राग येतो;परंतु त्या उलट काही कुटुंबे कर्तव्य भावनेतून नेत्रदानास

### जागतिक दृष्टी दान दिवस विशेष

प्राथमिकता देतात,असे दोन टोकांचे चित्र अनुभवास मिळत आहे. प्रत्येक कुटुंबाने नेत्रदानासाठी पुढाकार घ्यावा आणि आपल्या नातेवाईक व परिचितांना देखील त्यासाठी प्रवृत्त करावे अशी विनंती, नेत्रतज्ञ डॉ.प्रेम कुमार भट्टड यांनी केली.

--नेत्रदान करणा-याची जबाबदारी-

नेत्रदानाचे संमती पत्र भरून दिल्या बाबतची माहिती कुटुंबीय आणि फॅमिली डॉक्टरांना देणे.

--नातेवाईकांची जबाबदारी-

-मृत्यूनंतर मृत व्यक्तीचे डोळे त्वरित बंद करावेत.

-नेत्रदान करावयाच्या व्यक्तीच्या मृत्यूची माहिती तातडीने जवळच्या नेत्रतज्ञ किंवा नेत्र पेढीस कळवावी.

-डोळ्यांवर स्वच्छ,थंड पाण्याच्या पट्ट्या किंवा कापूस ठेवावा.

-मृताच्या डोक्याखाली उशी ठेवावी.

--नेत्रदान कोण करू शकतो ?

-वय,लिंग,जात नेत्रदानाच्या आड येत नाही.

-मधुमेह रक्तदाब असलेल्या व्यक्ती सुद्धा नेत्रदान करू शकतात.

-मोतीबिंदू,मोती बिंदूचे ऑपरेशन झालेल्या व्यक्ती सुद्धा नेत्रदान करू शकतात.

--नेत्रदान कोण करू शकत नाही?

-एड्स,धनुर्वाण,कावीळ, श्वानदंश,गुप्तरोग,कॅन्सर किंवा विषाणूजन्य आजारामुळे मृत झालेल्या व्यक्तीचे नेत्रदान स्वीकारले जात नाही.

-नेत्रदान करणाऱ्या मृत व्यक्तीचे रक्ताचे नमुने घेऊन आजारांबाबत खात्री केली जाते .

डोळे ही ईश्वराने मानवाला दिलेली फार मोठी देणगी आहे. परंतु, काही व्यक्ती यापासून वंचित असतात.

काही कारणास्तव त्यांना अंधत्व प्राप्त होते. त्यामुळे अशा व्यक्ती जगाचे सौंदर्य पाहू शकत नाहीत, सौंदर्याने भरलेली सृष्टी ज्यांना पाहता येत नाही. या व्यक्तींना नेत्र मिळाले, तर ते सृष्टीचा आस्वाद घेऊ शकतील. परमेश्वराने माणुसकी या नात्याने दृष्टी असणाऱ्या व्यक्तीने दृष्टिहीन व्यक्तीला नेत्रदान केले, तर दात्याच्या जीवनाचे नक्कीच सार्थक होईल. एकंदरित काय, दृष्टी ही फार महत्त्वाची आहे. कलियुगात दानाला फार महत्त्व प्राप्त झाले आहे.

मुद्रक, प्रकाशक नरेश विठ्ठल देसाई यांनी राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड, प्लॉट क्र. ५७, पवार कॉलनी, साताराසिटी, सातारा ४१५००२ करिता साहस प्रिंट्स, ६७/बी, रामनगर, पवार कॉलनी, शाहूपुरी, सातारा येथे छापून राजदंड मिडीया प्रायव्हेट लिमिटेड प्लॉट नंबर ५७, पवार कॉलनी, सातारासिटी, सातारा ४१५००२ येथे प्रसिद्ध केले. संपादक : नरेश विठ्ठल देसाई, दूरध्वनी - ९८३४६८७३६४, ईमेल - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

Printed and Published by Naresh Vitthal Desai on behalf of Rajdand Media Private Limited Plot no. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002 and Printed at Sahash Prints 67/B, Ramnagar, Pawar Colony, Shahupuri, Satara 415002 and Published at Rajdand Media Private Limited Plot No. 57, Pawar Colony, Sataracity, Satara 415002. Editor : Naresh Vitthal Desai, Phone - 9834687364, Email - rajdand.punegmail.com RNI No. : 72105, Title Code: M-HM-R17902

# महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस' जलमय स्थिती रोखण्यासाठी 'स्टॉर्म वॉटर लाईन'ला रेनवॉटर हार्वेस्टिंगची जोड द्या'

## पाच वर्षांपूर्वीच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करा: माजी उपमहापौर आबा बागुल यांची प्रशासनाला सूचना

**पुणे :** यंदाही पहिल्याच पावसात पुणे शहरच काय उपनगरेही 'पाण्या' गेली. तास - दोन तासांच्या पावसाने दाणादाण उडवून दिली शिवाय निद्रिस्त प्रशासन आणि सुस्त लोकप्रतिनिधी याचा पर्दाफाश पुन्हा एकदा झाला.दरवर्षी कोट्यवधी रुपये नालेसफाईवर खर्च करूनही दरवर्षी पावसाळ्यात शहराचे विविध भाग जलमय आणि वाहतुकीची कोंडी हे चित्र पुणेकरांसाठी चिंताजनक आहे. त्यामुळे यावर कायमस्वरूपी उपाय म्हणून पाच वर्षांपूर्वी दिलेल्या पावसाळी वाहिनीला रेनवॉटर हार्वेस्टिंगची जोड देऊन त्यासाठी स्वतंत्र 'सोक पिट' तयार करण्याच्या प्रस्तावाची अंमलबजावणी करा आणि पुणेकरांना दिलासा द्या अशी मागणी माजी उपमहापौर व महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे उपाध्यक्ष आबा बागुल यांनी केली आहे.

यासंदर्भात माजी उपमहापौर आबा बागुल म्हणाले की,गेल्या काही वर्षात पावसाचे प्रमाण वाढत आहे. पहिल्याच पावसात रस्ते जलमय, घरांमध्ये पाणी शिरण्याचे प्रमाणही वाढत आहे त्यामुळे दरवर्षी परिस्थिती चिंताजनक बनत आहे. त्यामुळे कोट्यवधींचा निधी दरवर्षी खर्च करूनही नालेसफाई सक्षमपणे होत नसल्याचे निदर्शनास येत आहे. मुळात 'स्टॉर्म वॉटर लाईन' मध्ये कचरा अडकल्याने पावसाचे पाणी नदीत वाहून जाण्यास अडथळा ठरत असल्याने शहराचे विविध भाग जलमय होत असल्याची वस्तुस्थिती आहे. संपूर्ण शहरात आपण सिमेंट क्रॉंक्रीटचे रस्ते साकारले आहेत आणि फुटपाथही सिमेंट ब्लॉकचे आहे मग पावसाळयात पावसाचे पाणी जमिनीत मुरणार कसे ? याचाही विचार पालिका प्रशासनाने केलेला नाही. त्यामुळे पाणी जमिनीत मुरून भूगर्भातील पाणीसाठा वाढण्यालाही बाधा निर्माण झाली आहे आणि पावसाचे पाणी थेट नाल्यातून वाहून रस्त्यांवर येत आहे.

पावसाळी वाहिनीमधून हे पाणी नदी - नाल्यात जाण्यासही अडथळा निर्माण झालेला आहे. त्यामुळेच पाच वर्षांपूर्वी पावसाळी वाहिनीला रेनवॉटर हार्वेस्टिंगची जोड देऊन त्यासाठी स्वतंत्र 'पिट' तयार करण्याचा प्रस्ताव दिला होता. त्याचा आराखडाही तयार केलेला आहे. जिथे पावसाळी पाणी वाहून नेणारी वाहिनी आहे. तिथे ठिकठिकाणी कूपनलिका घेऊन स्वतंत्र पिटद्वारे संरक्षित जाळीतून पावसाचे पाणी स्वच्छ होऊन भूगर्भात मुरविणे. जेणेकरून भूजल पातळीही वाढेल असा हा प्रस्ताव होता.

मात्र प्रशासनासह राजकीय अनास्थेमुळे हा प्रस्ताव आजही प्रलंबित आहे. वास्तविक दरवर्षी नालेसफाईवर ५० कोटी रुपयांचा निधी खर्च होतो मात्र या प्रस्तावानुसार कूपनलिका घेणे आणि संरक्षित जाळी संरचना असलेले 'सोक पिट'च्या माध्यमातून पावसाचे पाणी भूगर्भात जिरविण्यासाठी त्यातुलनेत खूपच कमी खर्च आहे. त्यात ही उपाययोजना कायमस्वरूपी असणार असून पावसाळयात कुठेही पाणी साठणार नाही, रस्ते जलमय होणार नाहीत याकडेही आबा बागुल यांनी लक्ष वेधले आहे.

# श्री शनैश्वर देवस्थान परिसरात भाविकांची अलोट गर्दी



**सोळशी येथील शनैश्वर देवस्थान परिसरात शनिदेवांच्या दर्शनासाठी भाविक भक्तांची अलोट गर्दी झाली होती.**

**पिंपोडे बुद्रुक :** धार्मिक स्थळासह सामाजिक प्रबोधनाचे अधिष्ठान म्हणून नावारूपास आलेल्या कोरेगाव तालुक्यातील सोळशी येथील सोळा शिवलिंगी श्री शनैश्वर देवस्थान परिसरात शनिदेवांच्या दर्शनासाठी गुरुवारी भक्तांनी गर्दी केली होती.

धार्मिक स्थळासोबतच सामाजिक प्रबोधनाचे अधिष्ठान म्हणून अल्पावधीत नावारूपास आलेल्या सोळशी येथील श्री शनैश्वर देवस्थान परिसरात मठाधिपती शिवयोगी नंदगिरी महाराज यांच्या संकल्पनेतून शनी जयंतीनिमित्त विविध धार्मिक व सामाजिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

बुधवार, दि. ५ शनी महात्म्य पारायण सोहळा सर्वोत्कृष्ट वाचक पुरस्काराचे वितरण करण्यात आले. सायंकाळी देवस्थानच्या वतीने विविध सामाजिक पुरस्कारांचे वितरण करण्यात आले. दरम्यान, यावेळी लाखो भाविक उपस्थित होते.

यंदाचा उन्हाळा अतिशय कडक आ तरी सर्व भक्तांना कुठल्याही प्रका त्रास होणार नाही, याची खबरदारी देवस्थानच्या वतीने घेण्यात आली. देवस्थान ट्रस्टमार्फत व पुष्पक को ऑपरेटिव्ह सोसायटी यांच्या सौजन भाविकांसाठी स्वच्छ पिण्याचे पाणी लाईट व जनरेटर, दर्शनबारी, वाहना व्यवस्था, परिसर स्वच्छता, जादा क स्वयंसेवक, वाहतूक पोलिस आदी नियोजन करण्यात आले होते. यावे ट्रस्टचे चेअरमन, व्हाइस चेअरमन, खजिनदार, सर्व विश्वस्त मंडळ, सब मंडळ, ट्रस्टचे कर्मचारी, पुष्पकचे कर्मचारी सेवेकरी, भाविक आदीनी ट्रस्टतर्फे व्यवस्था पाहिली.

**विचार बदला नशीब बदलेलफ या विचारधारेवर गेली पंचवीस वर्षांपेक्षा जास्त काळापासून शनैश्वर देवस्थान परिसरात सुरू असलेले धार्मिक व सामाजिक कार्य कौतुकास्पद आहे. आध्यात्मिक कार्याला विज्ञानाची जोड देत मठाधिपती शिवयोगी नंदगिरी महाराज यांचे विचार तळागाळातील जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी सेवाभावी, सहकारी संस्थांनी प्रयत्न करण्याची गरज आहे.**

**- गणपतराव पवार, चेअरमन, पुष्पक को. ऑपरोटिव्ह सोसायटी**

### देवस्थानकडून भाविकांची काळजी

**रोजी गोपूजन, धर्मध्वजारोहण आणि भजनांचा कार्यक्रम झाला. गुरुवारी सकाळी सर्वोदय पूजा, ५२ पात्री लघुरुद्र अभिषेक, पूर्णाहुती, महाआरती व महाप्रसाद, त्यानंतर उपस्थित संत-महंत यांना अन्नदान व वस्त्रदान करण्यात आले. दुपारी शिवयोगी त्यागेश्वर महाराज यांची पालखी मिरवणूक सोहळा पार पडला.**

# डॉ. निलेश माने यांचा शंभराव्या नाट्यसंमेलनात डंका

**सातारा :** आखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेने शंभराव्या नाट्यसंमेलना निमित्त संपूर्ण महाराष्ट्रात आयोजित केलेल्या नाट्यकलेचा जागर मध्ये एकांकिका विभागात लेबल या एकांकिकेच्या लेखनासाठी साताराच्या डॉ. निलेश माने यांना प्रथम क्रमांकाचा पंधरा हजारांचा पुरस्कार मिळाला. विजय केंकरे यांच्या शुभहस्ते हा पुरस्कार प्रदान केला गेला. यावेळी सुबोध भावे, मुक्ता बर्वे, रोहिणी हट्टंगडी, पुरुषोत्तम बेर्डे, सतीश राजवाडे कुमार सोहनी, विश्वास सोहनी, विजय केंकरे, सतीश लोटके, डॉ. अनिल बांदिवडेकर हे मान्यवर उपस्थित होते. नाट्य परिषद अध्यक्ष मा. प्रशांत दामले यांनी डॉ. निलेश माने यांचे अभिनंदन केले.

साताऱ्याच्या नाट्यचळवळीसाठी ही अभिमानाची आणि आनंदाची बाब आहे. साताराचे अनेक कलावंत तंत्रज्ञ हे वेगवेगळ्या व्यासपीठांवर आपला दबदबा निर्माण करत आहेत ही बाब सातारकरांसाठी अत्यंत अभिमानाची आहे. या यशासाठी साताऱ्याच्या सगळ्याच क्षेत्रांतून डॉ. निलेश माने यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

तुषार भद्रे, प्रमोद कोपर्डे, नितीन दीक्षित, सचिन मोटे, रवींद्र डांगे, रवींद्र इनामदार, डॉ. मिलिंद सुर्वे, राजीव मुळ्ये, अमित देशमुख, कल्याण राक्षे, संदीप जंगम, संतोष पाटील, रसिका केसकर, चैतन्य पाटेकर, प्रवीण यादव, जमीर आतार, भक्ती झणझणे, स्नेहा धडवई, रविना गोगावले, आनंद कदम, नील केळकर, मृणाल शिंदे, कुलदीप मोहिते, प्रशांत इंगवले, शशांक वाडेकर, कुमार मोने, बाळकृष्ण शिंदे आदी मान्यवर रंगकर्मींनी डॉ. निलेश माने यांचे अभिनंदन केले.

# कोल्हापूर जिल्ह्याला मुसळधार पावसाने झोडपले

**कोल्हापूर :** कोल्हापूर जिल्ह्यात मृग नक्षत्राच्या दुसऱ्याही दिवशी मुसळधार पाऊस झाला. पश्चिम घाटात पावसाचा जोर वाढला आहे. कागल तालुक्यात जोरदार प्रचंड पर्जन्यवृष्टीमुळे शेतकामासाठी गेलेले लोक अडकून पडले असून बाळेघोल जवळच्या आंबेओहोळ ओढ्याला पूर आला. आज दुसऱ्या दिवशीही जिल्ह्याच्या बहुतांशी भागात जोरदार पावसाने हजेरी लावली. कोल्हापूर शहरात दुपारपर्यंत उकाडा जाणवत होता सायंकाळी सात नंतर मात्र जोरदार पावसाने काही काळातच शहर जलमय झाले.

तथापि, जिल्ह्याच्या पश्चिम घाटात मुसळधार पाऊस पडत आहे. गगनबावडा, भुदरगड, शाहूवाडी, चंदगड, करवीर, हातकणंगले तालुक्यात जोरदार पाऊस झाला.

कागल ढगफुटी सदृश्य

कागल तालुक्यातील अनेक ठिकाणी पावसाने झोडपून काढले. कापशी - गडहिंग्लज रस्त्यावर रस्त्यावर इतके पाणी साचले की या भागावरील वाहतूक खंडित झाली. सेनापती कापशी, हणभरवाडी ,बेरडवाडी येथे दोन तास पाऊस सुरू राहिला. तमनाकवाडा गावात ढगफुटी सदृश्य पावसाने मोठ्या प्रमाणात नुकसान झाल्याचे वृत्त आहे. तुफान पावसांमुळे रानात,ओढ्यांत अडकलेल्या माणसांना दोर-वाल्याच्या सहाय्याने बाहेर काढण्याचा प्रयत्न सुरू होते. ठिक-ठिकाणी लोक अडकून असल्याचे संदेश समाज माध्यमात येत होते. त्याद्वारे माणसे मदतीसाठी जात होती.

# कुंभार गुरुजींचे शिक्षण क्षेत्रातील योगदान कौतुकास्पद : विश्वासराव धुमाळ

**आदर्की :** विजय ग्रामिण पतसंस्थेने सहकाराला शिक्षणाची जोड देत विद्यार्थींद-शेत शिक्षणासाठी विविध कर्ज योजना राबवुन ग्रामिण विद्यार्थी उच्यशिक्षित करण्याचा प्रयत्न केला

त्या प्रमाणे ग्रामिण भागातील आदर्श भावी पिढी घडविण्याचे काम कुंभार गुरुजींनी केल्याचे विजय ग्रामिण पतसंस्थेचे चेअरमन विश्वासराव धुमाळ यांनी केले.

विजय ग्रामीण बिगर शेती पतसंस्था आदर्की बु यांचे वती-ने उत्कृष्ट शैक्षणिक सेवेबद्दल सेवागौरव समारंभ आयोजित करण्यात आला होता. यावेळी शाल, श्रीफळ व सन्मानचिन्ह देवून सपत्नीक मा. विश्वासराव धुमाळ चेअरमन व राजेंद्र पवार व्हा. चेअरमन विजय ग्रामीण बिगर शेती पतसंस्था आदर्की बु यांचे शुभहस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी कुंभार सरांनी उत्कृष्ट शैक्षणिक कार्या सोबत उल्लेखनीय सामाजिक कार्य सुध्दा उत्कृष्ट केल्याची उदाहरणे देऊन पुढील सेवा पूर्ती नंतरच्या कार्यासाठी शुभेच्छा दिल्या.



**विजय ग्रामिण बिगर शेती सहकारी पतसंस्था मर्यादित आदर्की बु ।। या सस्थेच्या फलटण शाखेमार्फत सस्थेचे सल्लागार कृष्णात कुंभार यांचा सेवा निवृति बद्दल सत्कार करताना विश्वासराव धुमाळ राजेंद्र पवार आदी**

तसेच यावेळी पवार सरांनी शैक्षणिक काम करत असताना आलेल्या विविध अडचणी व त्यावर केलेल्या उपायाची आठवण काढून विविध स्पर्धा परीक्षा, क्रिडा स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रम, बालनाट्य तसेच इग्रजी विषयाच्या अध्यापनातील विशेष पद्धतीने विषय सोप्या पद्धतीने समजावून विद्यार्थ्यांचा सर्वांगीण गुणवत्ता विकास कसा साधला यास उजाळा दिला.आदरणीय केंद्रप्रमुख दारासिंग निकाळजे साहेब यांनी संघटना व प्रशासन यांचे मधील भूमिकेचा उल्लेख करून योग्य वेळी योग्य पध्द-तीने प्रशासनाकडून शिक्षकांच्या प्रश्नाविषयी सडेतोड ,निर्भीड घेतलेल्या भूमिकेविषयीचा गौरव करुन शुभेच्छा दिल्या

.यावेळी श्री.तिवाटणे सर पद-वीधर शिक्षक यांनी प्रश्नमंजुषा, बालनाट्य, तालुका स्तरीय प्रशिक्षण व उत्कृष्ट शालेय प्रशासनाबद्दल गौरोउद् गार काढले.

सोमनाथ लोखंडे यांनी उल्लेखनीय केंद्र संचालक पदा-वरील कार्याबद्दल माहिती देवून शुभेच्छा दिल्या. यावेळी जिल्हा क्रिडा शिक्षक नामदेव मोरे , सेवानिवृत्त चंद्रकांत सुतार , धनाजी कुंभार,नवनाथ चव्हाण काकासाहेब जगदाळे , विठ्ठल शिंदे सर, पत्रकार जगदाळे साहेब , अनिल चव्हाण , विजय रिटे , शाखा प्रमुख आतार व सर्व कर्मचारी उपस्थित होते. या सत्काराबद्दल श्री. कुंभार सरांनी उपस्थितांचे आभार व्यक्त केले.

# कोरेगाव रेल्वे स्टेशन येथे दारू पिण्यास मज्जाव केल्याने, रेल्वे पोलिसांवर तीन युवकांचा प्राण घातक हल्ला

**कोरेगाव :** कोरेगाव रेल्वे स्टेशन येथे गुरुवारी रात्री नऊच्या सुमारास दारू पिणाऱ्यांना रेल्वे पोलीस अंमलदार राजेंद्र शिंदे यांनी हटकले असता त्यांच्यावर प्राणघातक हल्ला केल्याने गंभीर जखमी झाले. जखमीस तात्काळ सातारा येथे उपचारार्थ दाखल करण्यात आले. कोरेगाव पोलीस व रेल्वे पोलिसांनी सीसीटीव्ही फुटेजच्या आधारे तिघांना शोधून काढून अटक केली.

करेगाव रेल्वे स्टेशन येथे गुरुवारी रात्री नऊच्या सुमारास दारू पिणाऱ्यांना रेल्वे पोलीस कॉन्स्टेबल राजेंद्र शिंदे कर्तव्य बजावत असताना अज्ञात तिन जण दारू पीत असल्याचे आढळले. त्यांनी तात्काळ त्यांना हटकले असता, संशयित आरोपींनी कर्तव्यावरील पो. शि. राजेंद्र शिंदे यांना दगडाने डोक्यात व पायावर मारून जबर जखमी केले. अतिरक्तस्राव होत असल्याने त स्टेशन मास्तर कोरेगांव यांचे कार्यालयात जावून प्रथमोपचार घेवून पो. ठाणेस कळविले. त्यानंतर सातारा रेल्वे पोलीस दुरक्षेत्राकडील पो. हवा आदिनाथ भोसले, पो. हवा. नितिन थोरात व पो. शि.दिपक घाडगे यांनी येवून कोरेगांव प्राथमिक आरोग्य केंद्रामध्ये त्यांचेवर प्रथमोपचार घेवून सातारा सातारा येथे खाजगी रुग्णालय दाखल केले.व अज्ञात तीन आरोपी विरूध्द कोरेगाव पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला. सदर घटनेची माहिती मिळताच लोहमार्ग पुणे पोलीस अधीक्षक तुषार दोशी व उपविभागीय पो. अधि. सोलापूर विभाग श्रीमती संगिता हत्ती यांनी घटनास्थळी भेट देवून तपासाबाबत सूचना देवून तात्काळ तपास पथके तयार करून आरोपीचे शोधा करिता रवाना केली.

# सायबर कॉमिक बुकचे पालकमंत्री शंभुराज देसाई यांच्या हस्ते अनावरण १ जुलैपासून

**सातारा :** सध्या मोबाईल, संगणक, ऑनलाईन बँकिंग, सोशल नेटवर्किंग साईट, इत्यादी गोष्टींचा वापर युवा पिढीमध्ये मोठ्या प्रमाणात वाढलेला असून मोबाईल, टॅब, संगणक व इंटरनेट हे व्यक्तीचे दैनंदिन जीवनातील अविभाज्य घटक बनले आहेत. मोबाईलमधील वेगवेगळ्या ॲप्लीकेशच्या माध्यमातुन विविध ॲपसद्वारे सायबर गुन्हयांमध्ये मोठ्या प्रमाणात दिवसेंदिवस वाढ होत चालली आहे.

सायबर गुन्हयांमध्ये फेसबुक, इंन्स्टाग्राम, टेलीग्राम, शेअरचॅट, ट्विटर अशा सोशल नेटवर्किंग साईटचा वापर करून व्यक्तींची बदनामी करणे, आर्थिक फसवणूक केली जात आहे. तसेच सोशल मिडीयावरुन फिशींग, आयडेंटीटी श्रेष्ट, रैमसनवेअर अटॅक, हॅकिंग, सायबर स्कॅमस, सायबर बुलींग, स्टाकिंग, सॉफ्टवेअर पायरसी, सोशस मिडीया फ्रॉडस, ऑनलाईन ड्रग्ज ट्राफिकिंग, इलेक्ट्रॉनिक मनी लॉन्डरींग, सायबर इक्स्टॉर्शन, ऑनलाईन रिक्रूटमेंट

## जिल्ह्यात सायबर जागरुकता अभियान



फ्रॉडस, इत्यादी प्रकारचे सायबर गुन्हे सध्या समाजामध्ये घडत आहेत.

जिल्हाधिकारी कार्यालयात पोलिस विभागाकडील विविध विषयांचा आढावा घेण्यासाठी आयोजित करण्यात आलेल्या बैठकी प्रसंगी या पुस्तिकेचे अनावरण करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी, जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन, पोलीस अधिक्षक समीर शेख, अप्पर पो-लीस अधिक्षक आँचल दलाल, सार्वजनिक बांधकाम विभागाचे अधिक्षक अभियंता संतोष रोकडे, निवासी उपजिल्हाधिकारी नागेश पाटील, महिला व बाल विकास अधिकारी विजय तावरे, यांच्यासह विविध यंत्रणांचे प्रमुख उपस्थित होते. याबाबत जनजागृतीसाठी तयार करण्यात आलेल्या सायबर कॉमिक बुकचे अनावरण पालकमंत्री शंभुराज देसाई यांच्याहस्ते झाले.सायबर गुन्ह्यांबाबत जागरुकता करण्याकरीता ०१ जुलै २०२४ पासून सा-तारा जिल्हा पोलीस दल व जिल्हा परिषद सातारा यांच्या संयुक्त विद्यमानाने सातारा जिल्हयातील जिल्हा परिषद अंतर्गत व खाजगी प्राथमिक व माध्यमिक शाळेतील इयत्ता ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांमध्ये सायबर जागरुकता वाढविण्याकरीता सायबर जागरुकता अभियान राबविण्यात येणार आहे.

यामध्ये सातारा जिल्हयातील सर्व शाळांमध्ये सायबर जागरुकता निर्माण करण्याकरीता सातारा जिल्हा पोलीस दलाकडून सायबर जागरुकतेसंबंधी सर्व सामग्री पुरविण्यात येणार आहे.

यामध्ये इयत्ता ६ वी ते १० वी मधील विद्यार्थ्यांमध्ये सदरसामग्रीचा वापर करुन १ जुलै २०२४ ते ३१ जुलै २०२४ या कालावधीमध्ये जिल्हयातील सर्व शाळांमध्ये सायबर जागरुकतेबाबत प्रशिक्षण देण्यात येणार असून प्रशिक्षण पूर्ण झाल्यानंतर विद्यार्थ्यांची परीक्षा घेण्यात येईल व या परिक्षेमधून ज्या विद्यार्थ्यांना (१ मुलगा १ मुलगी) चांगले गुण मिळतील त्यांना त्याच शाळेचे सायबर ॲम्बेसीडर म्हणून निवडण्यात येईल व त्यांचे मनोबल वाढविणेकरीता ऑगस्ट २०२४ चे पहिल्या आठवडयामध्ये त्यांचा सत्कार घेण्यात येणार आहे. सदर उपक्रमाचा उपयोग सायबर गुन्हयांना प्रतिबंध करण्याकरीता होणार आहे.


# पोलीस निरीक्षकपदी रुजू झालेले शिवाजी ननवरे यांनी सर केले मकालु शिखर

पाचगणी पोलिस ठाणे येथून नुकतेच नागपुर शहर सहायक ८४८५ मीटर उंचीचे मकालु शिखर सर करणारे ननवरे ठरले महाराष्ट्र पोलीसचे पाहिले अधिकारी; ननवरे यांची अभिमानास्पद कामगिरी...

वाई : पाचगणी पोलिस ठाणे येथून नुकतेच नागपुर शहर पोलीस गुन्हे शाखा येथे कार्यरत असलेले सहायक पोलीस निरीक्षक शिवाजी ननवरे यांनी आपल्या दुर्दम्य इच्छाशक्तीच्या जोरावर ३० मे २०२४ रोजी सकाळी साडे आठ वाजता जगातील पचाव्या उंच ठिकाणी माउंट मकालु येथे भारताचा तिरंग्या बरोबर महाराष्ट्र पोलीसचा झेंडा रोऊन महाराष्ट्र पोलिसांच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

मुळ गावं मु पो कोंढेज ता करमाळा जि सोलापूर येथील शिवाजी ननवरे हे महाराष्ट्र पोलीस मधून चौथे एवरेस्ट वीर (पाहिले ी खझड सुहेल शर्मा सर दुसरे पो हवा .रफिक शेख छ संभाजीनगर , तिसरे सपोनी संभाजी गुरव पुणे शहर)असून नागपुर पोलीस पोलीस चे पाहिले मकालु वीर आहेत.

माऊंट मकालूट शिखर हे चढाईस अत्यंत खडतर आहे खडकाळ भाग जास्त आहे त्यामूळे ७ हजार मीटर नंतर चढाईस खुपचं त्रास होतो



म्हणूनच बरेच गिर्यारोहक याकडे पाठ फिरवतात या वर्षी ३६ परमिशन दिल्या गेल्या होत्या परंतु नऊ जणांना टॉप वरती पोहचता आले.त्यामधे भारतातून शिवाजी ननावरे यशस्वी ठरले.

शिवाजी ननवरे यांना २०१८ साली पोलीस महासंचालक पदक,२०१९ साली केंद्र सरकारचे आंतरिक सुरक्षा पदक, तसेच खडतर सेवा पदकाने सन्मानित केले आहे तसेच त्यांना The Alpinist चे एवरेस्ट वीर भगवान चवले व एवरेस्ट वीर श्री -झख संभाजी गुरव यांनी बहुमूल्य असे मार्गदर्शन केल्याचे त्यांनी सांगीतले

याबाबत बोलताना शिवाजी ननवरे सांगीतले की माऊंट चरज्ञर्श्री सर करण्यासाठी शारीरिक क्षमते बरोबरच मानसिक क्षमता देखील असणे आवश्यक आहे उंच ठिकाणामुळे हवेतील तसेच शरीरातील ऑक्सिजनचे प्रमाणअत्यंत कमी असते त्यामुळे साधारण चालताना देखील शरीराची दमछाक होते, परंतु जिद्द आणि आत्मविश्वास असणारे ट्रेकर्सच नेहमी यशस्वी होतात

माऊंट चरज्ञर्श्री हे जगातील पाच नंबरचे उंच शिखर आहे हिमालय पर्वतातील हे शिखर ८४८५ मीटर उंचीचे असून नेपाळ चीन सीमेवर स्थित आहे या वर्षी सतत बदलत्या हवमनामुळे मला हे शिखर सर करणेसाठी ५५ दिवस लागले महारष्ट्र पोलीस मधून यापूर्वी कोणीही हे शिखर सर केले नसल्याने महारष्ट्र पोलिसांची प्रतिमा देशभरात आणखी वरती आली आहे कारण देशातून पोलिसांनी हे शिखर पहील्यानदा च सर झाले आहे

यासाठी मला नागपुर पोलीस कमिशनर श्री रवींद्रकुमार सिंगल सर, सह आउक्त अस्वती दोर्जे मॅडम ऊझझ श्री निमित गोयल सर ऊझझ क्ट पाटील मॅडम यांनी मोलाचे मार्गदर्शन व सहकार्य केले यामुळेच मी टॉप वरती पोहचू शकलो.

# शेतकऱ्यांना लॉटरी; अनुदानावर मिळणार बियाणे



**सातारा :** सातारा जिल्हा परिषदेच्या कृषी विभागाच्यावतीने यावर्षीही जिल्ह्यातील शेतकऱ्यांना खरीप हंगामात अनुदानावर बियाणे मिळणार आहेत. यासाठी जिल्हा परिषदेच्या ठराव समितीत ३० लाख रुपये खर्चास प्रशासकीय मान्यताही देण्यात आली. त्यामुळे शेतकऱ्यांना भात, ज्वारी, बाजरी, सोयाबीन, वाटाणा, घेवडा आदींचे बियाणे अनुदानावर उपलब्ध होणार आहे.

जिल्हा परिषदेची ठराव समितीची सभा लोकसभा निवडणुकीची आचारसंहिता संपल्याने शुक्रवारी मुख्य कार्यकारी अधिकारी याशनी नागराजन यांच्या अध्यक्षतेखाली पार पडली.

यावेळी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी महादेव घुले, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक संतोष हराळे, सामान्य प्रशासन विभागाचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी नीलेश घुले, ग्रामपंचायत विभागाच्या अर्चना वाघमळे, महिला व बालकल्याणच्या रोहिणी ढवळे, पाणी व स्वच्छता विभागाच्या क्रांती बोराटे, जिल्हा कृषी विकास अधिकारी विजय माईनकर, जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी डॉ. विनोद पवार, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंता मोदी, राहुल अहिरे, ग्रामीण पाणीपुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता गौरव चक्के, मुख्य लेखा व वित्त अधिकारी राहुल कदम, जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ. महेश खलिपे, जिल्हा जलसंधारण अधिकारी अरुण दिलपाक, प्राथमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी शबनम मुजावर आदी उपस्थित होते.या सभेत सुरुवातीला १६ मार्च रोजी झालेल्या सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करण्यात आला. तसेच झालेल्या ठरावांचा आढावा घेण्यात आला. त्यानंतर विविध विषयांवर चर्चा झाली. यामध्ये कृषी विभागाकडील बियाणे अनुदान योजनेलाही प्रशासकीय मान्यता देण्यात आली. जिल्हा परिषद सेस अंतर्गत कृषी विभागाच्यावतीने दरवर्षी शेतकऱ्यांना अनुदानावर बियाणे देण्यात येतात. यामध्ये अल्प, अत्यल्प भूधारक शेतकरी, महिला अन् दिव्यांग आणि मागासवर्गीय शेतकऱ्यांना बियाणे देण्यात येणार आहेत. यासाठी ३० लाख रुपयांची तरतूद करण्यात आलेली आहे.

०.४० हेक्टर जमीन क्षेत्राच्या मर्यादेत बियाणे अनुदानाचा लाभ शेतकऱ्यांना घेता येणार आहे. यामध्ये बियाणे किमतीच्या ५० टक्के किंवा दीड हजार रुपये यापैकी कमी असलेल्या रकमेचे अनुदान शेतकऱ्यांना मिळणार आहे. यावर्षी शेतकऱ्यांना भाज, सोयाबीन, संकरित बाजरी, ज्वारी आणि मका तसेच मूग, वाटाणा, घेवडा या बियाण्यांसाठी अनुदान आहे.

# फलटण तालुक्यात मान्सूनपूर्व पावसाचे आगमन

## आणखी पावसाची अपेक्षा



**फलटण :** फलटण तालुक्यात पावसाने हजेरी लावली असून आतापर्यंत सरासरी ६८.६ मि.मी. पावसाची नोंद झाली आहे. तथापि, खरीप पेरण्यांसाठी आणखी पावसाची गरज असल्याने शेतकरी आभाळाकडे डोळे लावून बसला आहे. हवेत अद्याप उष्मा कायम असल्याने येत्या २/४ दिवसात समाधानकारक पाऊस होईल अशी अपेक्षा व्यक्त होत आहे.

फलटण तालुक्यातील उपळवे, वेळोशी, दालवडी या भागात सलग दुसऱ्या दिवशी पावसाने हजेरी लावली. नीरा उजवा कालवा विभागाकडील नोंदीनुसार, भाटघर धरण पाणलोट क्षेत्रात गुरुवार, दि. ६ जून रोजी १० मि. मी. एकूण ६७ मि. मी. नीरा देवघर ७ मि. मी. एकूण ७ मि.मी., वीर २६ मि. मी. एकूण २८ मि. मी. आणि नीरा उजवा कालवा लाभ क्षेत्रातील पर्जन्य मापकावरील नोंदीप्रमाणे फलटण ३० मि. मी., निंबळक ४८ मि.मी., धर्मपुरी ६८ मि. मी., नातेपुते ३९ मि. मी., माळशिरस १४ मि. मी., अकलूज २२ मि. मी. आणि महाळुंग २५ मि. मी. पावसाची नोंद झाली आहे.

महसूल यंत्रणेकडील नोंदीनुसार फलटण तालुक्यात आतापर्यंत सरासरी ६८.६ मि.मी. आणि गुरुवार, दि. ६ जून रोजी महसूल मंडल निहाय फलटण ६१ मि. मी., आसू ७५ मि. मी., होळ ३३.३ मि. मी., गिरवी ४७.३ मि. मी., आदर्की ३३.३ मि. मी., वाठार निंबाळकर ५६ मि. मी., बरड ८७ मि. मी., राजाळे ५०.५ मि. मी., तरडगाव २३.३ मि. मी. सरासरी ५१.९ मि. मी. पावसाची नोंद झाली आहे. गतवर्षी पाऊस कमी झाल्याने धरणे पूर्ण क्षमतेने भरली नाहीत. परिणामी नद्यांना पूर आले नाहीत.

नद्या, नाले, ओढे कोरडे राहिले. त्यामुळे ग्रामतलाव, पाझर तलाव, लघु पाटबंधारे तलाव कोरडे राहिल्याने विहिरी कोरड्या राहिल्या. त्यामुळे गेल्या सुमारे ३/४ महिन्यांपासून तालुक्यात पाणी टंचाई सुरू झाली आहे.

प्रशासनाने तालुक्यातील १२७ गावांपैकी ८८ गावे टंचाई घोषित केली असून ३१ गावे व १०७ वाड्या वस्त्यांवर लोकवस्ती व जनावरांसाठी टँकरद्वारे पिण्याच्या पाण्याची व्यवस्था केली आहे, तथापि ती पुरेशी नसल्याने टँकरसंख्येत वाढ करण्याची मागणी होत असताना टंचाईग्रस्त गावांच्या संख्येत वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. गतवर्षी पाऊस नसल्याने खरीप व रब्बी दोन्ही हंगाम वाया गेले आहेत. एकही उन्हाळी पाऊस झाला नसल्याने बळीराजा धास्तावला असताना हवामान खाते आणि तज्ञांनी या वर्षी समाधानकारक पावसाची शक्यता व्यक्त केली असून जून महिन्यात मान्सूनपूर्व पावसाने दमदार हजेरी लावल्याने आशादायक चित्र निर्माण झाले आहे.

नीरा उजवा कालव्यातून उन्हाळी आवर्तन सुरू असताना दि. ५ मे रोजी कालव्याला गळती सुरू झाल्याने नीरा उजवा कालवा प्रशासनाने दि. ११ मे रोजी सुरक्षिततेच्या कारणास्तव सुरू असलेले उन्हाळी आवर्तन अपूर्ण ठेवून कालवा बंद केल्याने उभ्या पिकांचे विशेषतः ऊस, भाजीपाला व अन्य पिकांचे मोठे नुकसान होण्याचा धोका निर्माण झाला आहे.

# वादळी पावसाने झोडपले; झाडे कोसळली, तार तुटले, घरांचे छत-पत्रे उडाली



गोंदिया : जिल्ह्यात उन्हाच्या तीव्र झळा आणि ४२ अंशावर स्थिरावलेल्या तापमानामुळे नागरिकांना मान्सूनची प्रतिक्षा लागली होती. त्यातच काल (ता.७) पासून मृग नक्षत्राला सुरूवात झाली. त्यामुळे पावसाची प्रतिक्षा कायम असतानाच सायंकाळी वादळासह पावसाने हजेरी लावली. सुसाट वारा आणि पावसाने जवळपास दोन तास झोडपून काढल्याने अनेक झाडे कोसळली तर विज वाहिन्यांचे तार तुटली. वादळाचा घर, गोठ्यांना तडाखा बसल्याने नुकसान झाले. एंकदरीत वादळासह आलेल्या पावसाने गोंदियाकरांची तारांबळ उडाली होती.

जिल्ह्याचे तापमान ४२ अंशावर स्थिरावले आहे. उन्हाच्या तीव्र झळा आणि उकाड्याने गोंदिया जिल्हावासी हैराण झाले आहेत. त्यामुळे मान्सूनचे आगमन होऊन पाऊस केव्हा येणार, याची प्रतिक्षा सुरू आहे. त्यातच कालपासून मृग नक्षत्राला सुरूवात झाली. मृग नक्षत्रात जिल्ह्यात पाऊस हजेरी लावणार, असा अंदाज होता. परंतु, मागील दोन ते तीन दिवसांपासून तापमान आणि वातावरण लक्षात घेता पावसाची चिन्हे दिसून येत नव्हती. काल (ता.७) सायंकाळ होताच अचानक वातावरणात बदल होऊन आकाशात ढग दाटून आले. एवढेच नव्हेतर सुसाट वारा सुरू झाला. दरम्यान वेगवान वाऱ्यांने गोंदिया शहरासह जिल्ह्यातील अनेक भागात चांगलाच तांडव घातला. विजेच्या कडकडाटासह रात्री ७.३० वाजता सुमारास पावसाला सुरवात झाली. दरम्यान सुसाट वारा व (क्शर्रीं ठरळप) पावसाने तब्बल दोन झोडपून काढले. यामुळे नागरिकांची एकच ताराबळ उडाली. वादळाने अनेक वृक्ष कोलमडून पडली. विज वाहिन्यांची तारे तुटली तर नागरिकांचे घराचे छत, टिनाचे पत्रे, सोलर पॅनलसाठी उभारण्यात आलेले शेड वादळात सापडल्याने मोठे नुकसान झाले. आज दिवसभर संबधित विभागाचे कर्मचारी आणि नागरिक कालच्या वादळाने झालेली नासधूस दुरूस्त करताना दिसून आले. एंकदरीत वादळाने गोंदियाकरांची तारांबळ उडाली होती.

वादळाने 'महावितरण' क्लीन बोल्ड

काल सायंकाळी गोंदिया शहराला पावसासह आलेल्या वादळाचा चांगलाच तडाखा बसला. शहरातील अनेक भागात वादळाने तांडव घातल्याने नासधूस झाली. वादळाने अनेक वृक्ष कोलमडून पडले. यामुळे विज वाहिन्यांचे तारे तुटून विज पुरवठा खंडीत झाला होता. सायंकाळी ७ वाजता खंडीत झालेला विज पुरवठा मध्यरात्रीपर्यंत सुरळीत झाला. तर अनेक भाग अंधारातच राहिली. यामुळे महावितरणच्या मान्सून पुर्व कामांची पोलखोल झाली असून पहिल्याच पावसाने महावितरण क्लीन बोल्ड झाल्याची चर्चा शहरात सुरू होती.

# कपाशी बियाण्यांसोबत आता खताचाही तुटवडा.!

## कृषी विभागाचे नियोजन 'फेल', शेतकऱ्यांच्या संतप्त प्रतिक्रिया

**अकोट :** पसंतीचे बियाणे व खत मिळविण्यासाठी गेल्या १५-२० दिक्सांपासून शेतकऱ्यांना (त्रशीशी) सैरावैरा फिरावे लागत आहे. मात्र आजवर त्यांना आपल्या पसंतीचे बियाणे तसेच खातही मिळत नसल्याच्या व्यथा शेतकरी व्यक्त करीत आहेत.

शहरात काही कृषी केंद्रावर अतिरिक्त भावात पसंतीचे बियाणे विकले जात असल्याचेही शेतकरी सांगत आहेत. मात्र यावर कुठेच कृषी विभाग आक्रमक असल्याचे दिसत नाही यंदा मान्सून वेळेवर दाखल झाला आहे. पेरणीचे दिवस जवळ येत आहेत.

मात्र अशात शेतकऱ्याना आपल्या पसंतीचे बियाणे-खते मिळत नसल्यामूळे शेतकरी संभ्रमात दिसत आहे. आता पसंतीचे बियाणे येण्याची शक्यताही फार कमी आहे. म्हणजे यावर्षी तरी सदर बियाणे. उपलब्ध होईल, हे कोणीच सांगू शकत कृषी विभागाकडून इतर नाही. सोबत १०:२६:२६, युरिया तसेच डीएपीया खतांचा तुटवडा मोठ्या प्रमाणात आणवत आहे त्यामुळे शेतकरी संभ्रमात दिसत आहे. त्यात कृषी विभागाकडून शेतकऱ्यांनी बाजारात उपलब्ध असलेल्या दुसऱ्या जातीव्या बियाण्याची व खताची खरेदी करण्याचे आवाहन जिल्हा कृषी विभागाकडून करण्यात येत आहे. काही कृषी सेवा केंद्रावर हे बियाणे येत असून याची भनक कृषी विभागास लागू नये तसेच त्यांच्या स्टॉक रजिस्टरचा उतारा नसणे हाही चिंतनाचा विषय बनला आहे. त्यामुळेच शेतकऱ्याना १२०० ते २००० प्रति बॅग अशा अतिरिक्त भावाने खरेदी करावी लागत आहे. असले प्रकार. सांगण्यासाठी काही शेतकयांनी तालुका कृषी अधिकारी यांना कॉल केल्यास ते कॉल उचलतच नाहीत म्हणजेच झोपेचे सोग घेत तर नाहीत ना?: ? अशा संतप्त प्रतिक्रिया संबंधित अधिकाऱ्याऱ्यां बाबत शेतकरी व्यक्त करीत आहेत.


जिल्ह्यात अथवा तालुक्यात ज्या बियाण्यांचा तुटवडा जाणवत आहे त्याबाबत कृषी विभागाकडे आपल्या जिल्ह्यात किती बियाणे आले? ते कोणत्या विक्रेत्यास विल्या गेले? त्यांनी कोणात्त दिले? या व्यतिरिक्त जिल्ह्यात आणखी बाहेरून दुकानदारांनी किती बियाणे खरेदी केले? याबाबत संबंधित वरिष्ठांनी बिल बुक आणि स्टॉक रजिस्टर तपासल्यास मोठे गौडबंगाल समोर येईल, असे शेतकरी बोलत आहेत.

कृषी विभागाने शेतकऱ्याऱ्यांना सोडले वाऱ्यावर!

पसंतीचे बियाणेव खत मिळत नसल्याने शेतकरी संभ्रमात आहे. अशात तालुक कृषी विभागाने शेतकऱ्याऱ्यांना धीर देऊन कोणते बियाणे खरेदी करावे अथवा त्यांच्या जमिनीस कोणते बियाणे व खाते योग्य राहीलर कोणत्या जमिनीत कोणते बियाणे जास्त उत्पादन वाढविण्यास मदत करेल? याविषयी सूचना द्याव्यात. मात्र कृषी विभाग याबाबत कुठेच। पुढे येताना दिसत नाही. तालुका कृषी विभागाचे कृषी सहाय्यक सुध्दा महिना महिना फिरकूनही पाहत नसल्याचे शेतकरी सांगतात.

कृषी विभागाच्या नियोजनशून्य कारभाराने शेतकरी त्रस्त आहेत. जिल्ह्यातील बहुतांश सर्वच शेतकऱ्यांना कपाशी बियाण्यांसह खतही मिळत नाही कृषी विभाग हा झोपेचे सोंग घेऊन मुग गिळून आहे. संबंधित विभागाचे कुठेच नियोजन नसून त्यांची शेतकऱ्यांना पसंतीचे बियाणे आणि खते उपलब्ध करून देण्याची जबाबदारी आहे

# अजिंक्यतारा हा शेतकऱ्यांची काळजी घेणारा एकमेव कारखाना



## डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके; ऊस पीक शेतकरी कार्यशाळा उत्साहात संपन्न

**सातारा :** स्व. भाऊसाहेब महाराजांनी अजिंक्यतारा कारखान्याची उभारणी करून सातारा व आसपासच्या तालुक्यातील शेतकऱ्यांना आर्थिक उन्नतीच्या प्रवाहात आणले. आज या कारखान्यामुळे हजारो शेतकऱ्यांचे आर्थिक जीवनमान उंचावले आहे. शेतकऱ्यांच्या प्रगतीच्यादृष्टीने कारखाना व्यवस्थापन वेगवेगळ्या योजना, ऊस पिक उत्पादन वाढीसाठी विविध कार्यशाळांचे आयोजन सातत्याने करत असते. यामागे शेतकऱ्यांचा जास्तीत जास्त फायदा हा एकमेव उद्देश आहे. अजिंक्यतारा हा शेतकऱ्यांची सर्वार्थाने काळजी घेणारा एकमेव कारखाना आहे, असे प्रतिपादन माती व पाणी चिकित्सालय कृषी महाविद्यालय पुणे येथील व्यवस्थापक डॉ. धर्मेंद्रकुमार फाळके यांनी केले.

शेंद्रे ता. सातारा येथील अजिंक्यतारा सहकारी साखर कारखान्याच्या वतीने कारखाना कार्यक्षेत्रातील ६१६ शेतकऱ्यांच्या शेतावर पर्यावरण पूरक खोडवा ऊस व्यवस्थापनाचे प्रात्यक्षिक राबवण्यात आले. त्यासंदर्भात कारखाना कार्यस्थळावर ऊस पीक शेतकरी कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत बदलत्या हवामान परिस्थितीत पर्यावरणपूरक खोडवा उसाच्या शाश्वत व विक्रमी उत्पादन वाढ या संदर्भात डॉ. फाळके, पाडेगाव येथील ऊस संशोधन केंद्रातील कीड व रोग शास्त्रज्ञ डॉ. सूरज नलावडे, सातारा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे कृषी अधिकारी अमृत भोसले यांनी मार्गदर्शन केले.

यावेळी कारखान्याचे चेअरमन यशवंत साळुंखे, व्हा. चेअरमन नामदेव सावंत, कार्यकारी संचालक जिवाजी मोहिते यांच्यासह सर्व संचालक आणि अधिकारी उपस्थित होते. ग्लोबल वॉर्मिंग, पर्यावरणातील बदल जाणून घेऊन शेतीमध्ये आमूलाग्र बदल झाला पाहिजे. उसाचे उत्पादन कमी होते आणि खर्च वाढतो, अशी ओरड आपण ऐकत असतो. शेतीमध्ये क्रांती घडली तरच देशाची प्रगती होणार आहे. खोडवा ऊस पीक हे काटक असल्याने वातावरणातील ताण तणाव सहजरित्या सहन करते.

अनियमित ऊस लागवड, दुर्लक्षित लागवड तंत्रज्ञान, जमिनीचे बिघडलेले आरोग्य याचा सारासार विचार करून असे प्रकार घडू नयेत याची काळजी घेतली पाहिजे. अमर्यादित पाणी वापर कटाक्षाने टाळला पाहिजे. शेतीसाठी ठिबक सिंचन पद्धतच वापरली गेली पाहिजे, असे डॉ. फाळके यांनी सांगितले. ऊस पिकावरील विविध प्रकाराची कीड, रोग आणि त्यासाठीचे नियंत्रण, औषध फवारणी तसेच पिकाची घ्यावयाची काळजी याबाबत डॉ. सूरज नलावडे यांनी मार्गदर्शन केले. शेती अधिकारी विलास पाटील यांनी सूत्रसंचालन करून आभार मानले. कार्यशाळेला अजिंक्यतारा कारखाना कार्यक्षेत्रातील शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# हिमाचल प्रदेशातील जटोली शिवमंदिरात 'दगडूशेठ' चे बाप्पा विराजमान होणार

**पुणे :** यंदा दगडूशेठ हलवाईगणपतीट्रस्टतर्फे गणेशोत्सवात हिमाचल प्रदेशमधील जटोली शिवमंदिराची प्रतिकृती साकारण्यात येणार आहे. आशियातील सर्वात उंच शिवमंदिर म्हणून या मंदिराची ओळख आहे. हिमालयाच्या सानिध्यात असलेल्या आणि पवित्र समजल्या जाणाऱ्या या अतिशय तेजस्वी मंदिराची प्रतिकृती करण्यात येणार असल्याची माहिती ट्रस्टचे अध्यक्ष माणिक चव्हाण यांनी दिली.

हिराबाग कोठी येथील ट्रस्टच्या सजावट विभागात रविवारी (दि.८) सजावटीच्या कामाचा शुभारंभ सोहळा कलादिग्दर्शक अमन विधाते व दीपाली विधाते यांच्या हस्ते झाला. यावेळी ट्रस्टचे उपाध्यक्ष सुनील रासने, कोषाध्यक्ष महेश सूर्यवंशी, सरचिटणीस हेमंत रासने, उत्सव प्रमुख अक्षय गोडसे, सहचिटणीस अमोल केदारी, सुवर्णयुग तरुण मंडळाचे अध्यक्ष प्रकाश चव्हाण उपस्थित होते. यंदाची प्रतिकृती असलेलेहिमाचल प्रदेशच्यासोलन मधील जटोली शिव मंदिर हे डोंगराच्या माथ्यावर वसलेले मंदिर आहे. जटोली हे नाव महादेवाच्या लांब जटावरून पडले आहे. हे मंदिर स्थापत्यकलेचा उत्कृष्ट नमुना आणि एक चमत्कारच आहे. पुराणातील उल्लेखानुसार भगवान शिवाच्या सर्वात प्राचीन मंदिरांपैकी एक असून हे मंदिर एकेकाळी भगवान शंकराचे विश्राम स्थान होते, असे मानले जाते.

जटोली मंदिर विशिष्ट अशा दक्षिण-द्रविड वास्तुशैलीमध्ये बांधले गेले आहे आणि ते सलग तीन

# स्वतःची बुद्धिमत्ता ओळखून करिअर क्षेत्र निवडा : अविनाश धर्माधिकारी

पिंपरी : कोणत्याही क्षेत्रात करिअर करण्यासाठी केवळ मार्क महत्वाचे नाहीत. स्वतःमधील गुण ओळखून कोणत्या क्षेत्रात करिअर करायचे हे ठरवा. उच्च गुण प्राप्त करणारा विद्यार्थी जीवनात यशस्वी होतोच असे नाही, यासाठी बुध्दिमत्ता आवश्यक आहे. आपली बुध्दिमत्ता कोणत्या क्षेत्रात चालते हे ओळखता आले, तर खऱ्या अर्थाने तुमच्या करिअर वाटा मोकळ्या होतील. गुणवत्तेबरोबर बुध्दिमत्ता महत्वाची असल्याची ठोस भूमिका माजी सनदी अधिकारी डॉ. अविनाश धर्माधिकारी यांनी विद्यार्थ्यांसमोर मार्गदर्शन करताना शनिवारी मांडली. तसेच करिअर आणि व्यक्तिमत्त्वासाठी विचार व आचाराची त्रिसूत्रीही त्यांनी विद्यार्थ्यांना सांगितली.

भाजपचे शहराध्यक्ष शंकर जगताप यांच्या वतीने दहावी व बारावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांसाठी पिंपरीतील प्रा. रामकृष्ण मोरे प्रेक्षागृहात करिअर मार्गदर्शन विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. त्यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी महापौर उषा ऊर्फ माई ढोरे, माजी उपमहापौर सचिन चिंचवडे, माजी सत्तारूढ पक्षनेते नामदेव ढाके, स्थायी समितीचे माजी सभापती विलास मडिगेरी, माजी नगरसेवक सुरेश भोईर, अभिषेक बारणे, राजेंद्र गावडे, बाबासाहेब त्रिभुवन, सागर आंगोळकर, अंबरनाथ कांबळे, माजी नगरसेविका उषा मुंढे, सविता खुळे, नीता पाडाळे, शिक्षण मंडळाचे माजी उपसभापती नाना शिवले, भाजपचे दक्षिण भारतीय आघाडी प्रदेशाध्यक्ष राजेश पिल्ले, भाजपचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजू दुर्गे, प्रदेश सदस्य अजित कुलथे, मंडल अध्यक्ष सोमनाथ भोंडवे, प्रसाद कस्पटे, संदीप नखाते, बेटी बचाव बेटी पढाओ संयोजक प्रीती कामतीकर, बुद्धीजीवी सेल संयोजक मनोजकुमार मारकड, भाजप महिला मोर्चा माजी अध्यक्षा उज्ज्वला गावडे, शेखर चिंचवडे, माजी स्वीकृत सदस्य देविदास पाटील, विनोद तापकीर, तानाजी बारणे, युवा मोर्चा संयोजक चिंचवड विधानसभा योगेश चिंचवडे, जिल्हा नियोजन समिती सदस्य काळूराम नढे, गणेश गावडे, कविता दळवी, पल्लवी पाठक, दिपाली कालापुरे, भाजपा शिक्षक आघाडी संयोजक प्रा.दत्तात्रय यादव, सहसंयोजक प्रा.संजय शेंडगे, प्रा.रावसाहेब यादव तसेच विद्यार्थी, पालक आणि भाजपा पदाधिकारी व कार्यकर्ते आदी उपस्थित होते.

अविनाश धर्माधिकारी म्हणाले, इंजिनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सीए या अभ्यासक्रमाकडे विद्यार्थ्यांचा व त्यांच्या पालकांचा कल वाढला आहे. हे क्षेत्र करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाचे समजले जाते. मात्र विद्यार्थ्यांमध्ये या अभ्यासक्रमांसंदर्भात रूची नसेल, मित्रांच्या अथवा पालकांच्या दबावात विद्यार्थी या क्षेत्राची निवड करत असतील, तर त्या विद्यार्थ्याचे करिअर धोक्यात राहिल. त्यामुळे विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम आपली योग्यता, परिश्रम करण्याची तयारी, आवड हे लक्षात घेऊन करिअरची निवड करावी, असा सल्ला त्यांनी दिला.

ते म्हणाले, विद्यार्थी व पालकांनी परीक्षेत गुण किती मिळाले यावर गुणवत्ता ठरवू नये. जीवनामध्ये यशस्वी होण्यासाठी गुण हे सर्वस्व नाहीत. पालकांनी आपल्या मुलांना करिअर निवडण्याची आणि घडविण्याची मुभा द्यावी. त्याला जे क्षेत्र आवडते, त्या क्षेत्रामध्ये उत्तुंग कामगिरी करण्यासाठी प्रोत्साहित करावे. केवळ डॉक्टर आणि इंजिनिअर झाला म्हणजे जीवनामध्ये यशस्वी झाला असे नाही. प्रत्येक विद्यार्थ्यामध्ये बुद्धिमत्ता असते. आपण निवडलेल्या क्षेत्रात ज्यांना आयुष्यभर विद्यार्थी म्हणून राहायचे कळलेय, त्यांची वाटचाल अलौकिक बुद्धिमत्तेकडे चालू राहते.

ज्याचा मेंदू शाबूत आहे असा प्रत्येकजण बुद्धिमान आहे. आपली बुद्धी कोणत्या क्षेत्रात चालते हे ओळखणे म्हणजे स्वतःला ओळखणे होय. प्रत्येक विद्यार्थ्याने करिअर निवडताना स्वतःमध्ये डोकावून पाहावे. मन, बुद्धी, व्यक्तीमत्त्वाचा ओढा जिकडे ते करिअर करावे. स्कोप करिअरला नसतो, व्यक्तीला असतो. सगळे करिअर समान आहेत. स्वतःची बुद्धिमत्ता ओळखून करिअर ठरवावे.